# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ०६ जुलै, २०१८ / आषाढ १५, १९४० (शके)**

**(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी, फलोत्पादन मंत्री**
**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६९**

---

### मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत

**(१) * ४१७६४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.चंद्रकांत रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी पालघर, डहाणू, वसई आणि तलासरी (जि.पालघर) या तालुक्यातील ८० गावांमधील जमीन अधिग्रहणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत बुलेट ट्रेन प्रकल्प मार्गासाठी पालघर जिल्ह्यातील शेतकरी व भुमिपुत्रांनी जमीन देण्यास विरोध दर्शविल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी लागणारी जमीन संपादित करण्यासाठी सफाळे आणि केळवे गावात तसेच ठाणे जिल्ह्यातील दिवा-शिळ या गावातील शेतकरी आणि भुमिपुत्रांना नोटीसा पाठवून सर्वेक्षण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर तालुक्यातील सफाळे, केळवे या पश्चिम पट्ट्यालगतच्या टेंभी, खोडावे, जलसार, विराथन, शिलटे, रामबाग, मांडे, माकुणसार, रोठे, केळवे रोड, कामारे या गावातील शेती आणि बागायती नष्ट होणार असल्याने ग्रामस्थांचा विरोध असतांनाही विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना दलाल आणि शासकीय अधिकाऱ्यांमार्फत धमकावले जात असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे मार्च-एप्रिल, २०१८ मध्ये लेखी निवेदने देऊन केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई-अहमदाबाद शहरांदरम्यान अतिवेगवान रेल्वे प्रवासासाठी बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या उभारणीसाठी आवश्यक बाबींवर कालबध्द कार्यवाही करावी तसेच या प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनींचा मोबदला तातडीने देण्यात यावा असे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिले असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत भुमिका स्पष्ट करुन या प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहणाबाबत कार्यवाही करुन जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

ता.पालघर येथील सफाळे, केळवे गावांत सर्वेक्षणाची कार्यवाही सुरु आहे तसेच ता.ठाणे येथील ७ गावांमधील शेतकऱ्यांना संयुक्त मोजणीच्या नोटीसा पाठवून सर्वेक्षणाची कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सदर प्रकल्पासाठी ठाणे व पालघर जिल्ह्यातील खाजगी जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही ही शासन निर्णय, दिनांक १२/०५/२०१५ च्यान्वये निश्चित केलेल्या शासन धोरणाप्रमाणे करण्यात येत आहे.

संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीमध्ये मोबदला निश्चित करुन त्याप्रमाणे पुढील आवश्यक ती कार्यवाही पुर्ण केल्यानंतर संबंधित भूधारकांना मोबदला वाटपाची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

-----------------

## अरबी समुद्रात उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाबाबत

**(२) * ४१३३० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७८२४ ला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरबी समुद्रात उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाच्या कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, सदर काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे व किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या स्मारकासाठी रुपये ३८२६ कोटी या अंदाजित खर्चापैंकी प्रत्यक्षात किती निधी केव्हा उपलब्ध करण्यात आला आहे व उर्वरित निधी कशाप्रकारे केव्हा उपलब्ध करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

या कामासाठी अरबी समुद्रामध्ये या प्रकल्पाच्या जागेवर भूस्तराचे सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) सदर काम पूर्ण करण्यासाठी ३६ महिन्याचा कालावधी विहित केला आहे.

(३) या स्मारकासाठी रुपये २५८१ कोटी + वस्तू व सेवा कर इतकी रक्कम निश्चित केली आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी रुपये ३०० कोटी रकमेची तरतूद केली आहे. उर्वरित निधी आवश्यकतेनुसार टप्या-टप्याने उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याबाबत

**(३) * ४१८०५ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे मोठ्या प्रमाणावर अनेक वर्षापासून मत्स्यव्यवसाय सुरू असल्याने मच्छीमारांच्या सोयी-सुविधा तसेच विक्री व अन्य मत्स्यव्यवसायासाठी लागणाऱ्या बाबी विचारात घेवून हर्णे येथे अद्यावत मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याबाबत स्थानिक मच्छीमारांनी मागील ५ वर्षापासून मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हर्णे येथे मत्स्यव्यवसाय संदर्भात कोणत्याही सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत तसेच, मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याच्यादृष्टीने कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हर्णे येथे मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) केंद्र पुरस्कृत सागरमाला योजनेंतर्गत हर्णे येथील मत्स्य बंदर विकसित करण्याबाबतचा रुपये २८५.३२ कोटी रकमेचा प्रस्ताव केंद्र शासनास दिनांक १३/०४/२०१८ रोजी सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(४) * ४१२९७ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७६३५ ला दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीमधील इमारतीच्या बांधकामाची वारंवार पडझड होत असून माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान वसाहतीमधील एका इमारतीच्या घरातील छताचा भाग कोसळून झालेल्या दुर्घटनेत ईशान मिसाळ हा बारा वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रहिवाश्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, वांद्रे यांच्याकडे तक्रारी करुनही इमारत दुरुस्तीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसाहतीचा पुनर्विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे, पुनर्विकासाला किती खर्च येणार आहे व सदर पुनर्विकास किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसाहतीची दुरुस्तीची कामे न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदर वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करणे विचाराधीन असून त्यास अनुसरून प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करणे प्रगतीत आहे. बाह्य अर्थसहाय्याद्वारे कर्ज उभारुन अस्तित्वातील इमारतींच्या जागी बहूमजली इमारती बांधण्याचे प्रस्तावित आहे. सुसाध्यता अहवाल प्राप्त झाल्यावर तसेच कर्ज उभारणे प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुनर्विकासाचा खर्च व कालावधी अंतिम होईल.
(४) व (५) सदर वसाहतीमध्ये वारंवार घडत असलेल्या घटना विचारात घेऊन संरचनात्मक परिक्षणानुसार तातडीने संरचनात्मक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येत आहेत.

-----------------

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) देवस्थान मालकीच्या जमिनी बेकायदेशीर हस्तांतर केल्याबाबत

**(५) * ४२१६४ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.अपूर्व हिरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, ॲड.अनिल परब, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप, श्री.प्रविण दरेकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील कोलंबिका देवी मंदिराच्या दिवाबत्तीसाठी दान देण्यात आलेल्या तसेच कोलंबिका देवी व गंगाद्वार ट्रस्टची मिळकत असलेल्या त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या मालकीची रुपये २०० कोटी किंमतीची

१८४ एकर जमीन महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमत करुन बेकायदेशीर हस्तांतरण केल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन वर्ग-३ मध्ये मोडत असतांना शासनाची/धर्मादाय आयुक्तांची परवानगी न घेता जमिनीच्या हस्तांतरणाचे ५ करारनामे करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बेकायदा व्यवहाराप्रकरणी तहसिलदार, मंडल अधिकारी व तलाठी यांच्याविरोधात शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात येवूनही त्यांच्या विरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे त्र्यंबकेश्वर येथील गट नं. ३०१, ३२१, ३२७, ३२२/२, ३२३, ३२५, ३२८, ३२४, ३५८, ३०० व ३२६ या देवस्थान इनाम वर्ग-३ च्या मिळकती कोलंबिका देवी व गंगाव्दार ट्रस्ट यांच्या नावे होत्या. सदर मिळकती ट्रस्टकडून सौ.संध्या सचिन दप्तरी व इतर यांनी सन २००७ मध्ये शासन व धर्मादाय आयुक्त यांच्या परवानगीशिवाय वेगवेगळ्या नोंदणीकृत भाडेपट्टयाने अकृषीक प्रयोजनार्थ वहितीस घेतल्या. तद्नंतर सौ.संध्या सचिन दप्तरी व इतर यांनी तत्कालिन तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण, त्र्यंबकेश्वर यांचेकडे कुळ कायदा कलम ३२-ओ प्रमाणे सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालिन तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी प्रकरणी दावे चालवून सदर जमिनीची किंमत ठरवुन जमीन खरेदी करणेबाबतचे आदेश पारित करुन ३२ एम खालील प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. सदर आदेशांस अनुसरुन उक्त देवस्थान जमिनींच्या खरेदीचे ५ व्यवहार नोंदणीकृत करण्यात आले असून जमिनी सौ.संध्या सचिन दप्तरी व इतर यांना अदा केलेल्या आहेत.

(३) व (४) देवस्थानाच्या जमिनीच्या हस्तांतरणास प्रत्यवाय असतांना शासकीय दस्तावेज तयार करुन पदाचा गैरवापर केल्याच्या अनुषंगाने तत्कालिन तहसिलदार त्र्यंबकेश्वर, संबंधित मंडळ अधिकारी, तलाठी व इतर यांच्याविरुध्द त्र्यंबकेश्वर पोलीस ठाणे येथे दिनांक २५/०२/२०१८ रोजी एफ.आय.आर. नोंदविण्यात आलेला आहे. सदर दाखल एफ.आय.आर. च्या अनुषंगाने पोलिसांमार्फत गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

तत्कालिन तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी पारित केलेल्या कुळ कायद्याखालील आदेशांच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, त्र्यंबकेश्वर यांच्यास्तरावर स्वाधिकारे पुनर्रिक्षणाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी लोकसेवक असलेले तत्कालिन तलाठी, मंडळ अधिकारी व दोन तत्कालिन तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकण कृषी विद्यापीठाच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(६) * ४२०८८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रतिकुल वातावरणाचा सामना करण्यासाठी कोकण कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कृषी विभागाने आंबा मोहर आणि उत्पादन वाचविण्यासाठी तयार करण्यात आलेला कृती आराखड्यावर अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वर्षाच्या हंगामात निर्यात करण्यात आलेली आंब्याची गुणवत्ता घसरली असून परदेशी पाठविण्यात येणारी निर्यात कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यास विलंब केलेल्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन कोकणातील आंब्याचे उत्पादन वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रतिकूल वातावरणाचा सामना करण्यासाठी डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कृषी हवामान विभागनिहाय अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली होती. त्या गटाने विविध बैठका घेऊन आंबा या पिकासोबतच अन्य कोकणातील शेती संबंधित विविध विषयावरील शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. सन २०१७-१८ च्या आंबा हंगामामध्ये कृषी विभागामार्फत कोकणामध्ये विविध ठिकाणी आंबा बागायतदारांसाठी मेळावे आयोजित करण्यात आले होते. तसेच दिनांक १५/१२/२०१७ ते २९/१२/२०१७ या कालावधीमध्ये आंबा मोहोर संरक्षण पंधरवाडा पूर्ण कोकणात राबविण्यात आला होता.या व्यतिरिक्त डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठामार्फत दिनांक ०४/१२/२०१७ ते दिनांक ०५/१२/२०१७ रोजी कृषी अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या कार्यशाळा घेवून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले होते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे ओवळे (ता.जि.ठाणे) येथील जमीन गैरव्यवहाराबाबत

**(७) * ४२०४४ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८४८७ ला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे ओवळे (ता.जि.ठाणे) येथील स.नं. २०८, १६२, २९७, २९८ व २९९ या जमिनी फेरफार क्र.९९२, दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ नुसार बोगस कागदपत्रांच्या आधारे गुरचरण नोंद कमी करुन मे.लोढा नोव्हेल बिल्डफार्म प्रा.लि. व इतर यांच्या नावे करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोगस कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक करुन उक्त जमिनी मे.लोढा नोव्हेल बिल्डफॉर्म प्रा.लि. व इतर यांच्या नांवे करणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन सदर जमिनीवर पुन्हा गुरचरण नोंद घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे ओवळे, ता.जि.ठाणे येथील फेरफार क्रमांक ५९०, दिनांक ३०/०५/१९५६ पाहाता स.नं. २०८, १६२, २९७, २९८ व २९९ या जमिनीसंदर्भात चौकशी होऊन सदर जमिनी तालुका हुकुमान्वये श्री.द्वारकादास रतनशी यांच्या खाजगी मालकीच्या ठरवून त्यावरील जंगल नोंद कमी केली असल्याचे दिसून येते.

नंतर मौजे भाईंदरपाडा, ता.जि.ठाणे येथील जुना स.नं. २०८पै. (नवीन स.नं. ४/१) एकूण क्षेत्र १०-६२.५ हे-आर पैकी १२ एकर क्षेत्र मे.कॉसमॉस क्वारीज यांचेकडून मे.लोढा नोव्हेल बिल्डफार्म प्रा.लि. यांनी दिनांक १८/१०/२०११ रोजी खरेदी केल्याची नोंद फेरफार क्रमांक ७६६, दिनांक ०४/११/२०११ अन्वये दिसून येते.

तद्नंतर मौजे ओवळे या गावातील भाईंदरपाडा या पाड्याचे नविन गावांत रुपांतर होऊन भाईंदरपाडा हे गाव झाले असून येथील जुने स.नं. २०८पै, १६२पै, २९७, २९८पै व २९९ या मिळकतीसंदर्भात उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडे दाखल अपिलात उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०६/०८/२०१५ व दिनांक १२/०८/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये उक्त मिळकत गुरचरण म्हणून पुन:स्थापित करण्यात आल्याचे फेरफार क्रमांक ९९२, दिनांक १७/०८/२०१५ अन्वये दिसून येते.

उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्या उक्त आदेशाविरुध्द दाखल अपिलात अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २८/०९/२०१६ च्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचे उक्त आदेश व त्यानुषंगाने घेण्यात आलेला फेरफार क्रमांक ९९२ रद्द केला असून उक्त मिळकतीवरील

गुरचरण नोंद कमी करुन मे.लोढा नोव्हेल बिल्डफार्म प्रा.लि. व इतर यांची नावे पुन्हा अधिकार अभिलेखात दाखल झाल्याचे फेरफार क्रमांक १०३७, दिनांक ०४/११/२०१६ अन्वये दिसून येते. सदर आदेश हे अर्धन्यायिक स्वरुपाचे असून सर्व संबंधितांना सुनावणीची संधी देवून पारीत केलेले आहेत.

-----------------

## अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(८) * ४१८७१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील सन १९९४ मधील एनरॉन प्रकल्पासाठी शेतकऱ्यांची शासनाकडून संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप त्यांना मिळाला नसून याबाबत न्यायालयाच्या निकालानंतरही ११ महिन्यांचा कालावधी होऊनही सदर शेतकऱ्यांच्या वारसदारांना जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार कोणत्याही जमिनीचे भूसंपादन झाल्यानंतर संबंधित जमीन मालकाला मिळणाऱ्या एकूण रकमेवर पहिल्या वर्षी ९ टक्के तर दुसऱ्या वर्षापासून १५ टक्के व्याज देणे बंधनकारक असतानाही प्रत्येक वेळी वेगवेगळी कारणे देऊन या शेतकरी अथवा त्यांच्या वारसदारांना मोबदला न देता परत पाठविण्यात येत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत

**(९) * ४२१७९ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान झाराप-भावई मंदिर येथे बॉक्सवेल व झाराप तिठा येथे ओव्हरब्रीज बांधणीच्या मागणीसाठी झाराप पंचक्रोशी ग्रामस्थांनी आंदोलन करुन चौपदरीकरणाचे काम थांबविल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम झाराप येथे वेगाने सुरु असुन झाराप-भावई मंदिर, ग्रामपंचायतीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवर बॉक्सवेल किंवा सर्कलची तरतूद शासनाने केली नसल्याने गावात जाणारा मुख्य मार्ग बंद होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई गोवा रा.म.क्र. ६६ चे कि.मी. ०/०० ते कि.मी. ८४/०० मधील चौपदरीकरण केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांच्यावतीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत व इंदापूर ते झाराप कि.मी. ८४/०० ते ३६६/०० ह्या केंद्रिय रस्ते, वाहतुक व महामार्गाच्यावतीने राज्य शासनामार्फत लांबीतील चौपदरीकरणाचे काम प्रगतीत आहे. झाराप भावई मंदिर व झाराप

तिठा येथे एक भुयारी मार्ग व सेवा रस्ता प्रस्तावित असून मुख्य मार्ग बंद होणार नाही. परंतु गावकऱ्यांच्या मागणीप्रमाणे बॉक्सवेलची तरतूद करणेबाबतची शक्याशक्यता तपासणेचा प्रस्ताव तयार करणेचे काम हाती घेण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंब-केज-धारूर-तेलगाव-माजलगाव (जि.बीड) रस्ते दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१०) * ४१४१९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे बीड जिल्ह्यातील कळंब-केज-धारूर-तेलगाव-माजलगाव या रस्त्याला महामार्गाचा दर्जा प्राप्त झाला असून या महामार्गाचा केंद्र शासनाच्या रस्ते विकास मंत्रालयाने वार्षिक नियोजनात समावेश केला असून कामाच्या निविदा स्वीकृत झाल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांना दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी पत्राद्वारे दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी उक्त रस्त्यावरील कि.मी. १०१/०० ते १०३/८०० ची सुधारणा करणे या रुपये १ कोटी किंमतीच्या कामास दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी कार्यारंभ आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामात अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमत करुन प्रत्यक्ष काम न करता केंद्र शासनाच्या निधीतून झालेले काम सार्वजनिक बांधकाम विभागाने केल्याचे दाखवून करोडो रुपयांची बनावट देयके सादर करुन निधीचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना क्र. ४० मध्ये उक्त बाबींच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्याचे निर्देश शासनाने दिनांक १३/०३/२०१८ रोजी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही. तथापि, अशाप्रकरणी चौकशी करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.
(५) सदर प्रकरणात दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील पशुवैद्‌यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत

**(११) * ४१७६८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गाजगांव व सिध्दनाथवडगांव (ता.गंगापुर, जि.औरंगाबाद) येथील पशु रुग्णालयेंतर्गत ३४ गावे असुन गावात किमान २५००० जनावरे/पशुधन आहेत, गाजगांव व सिध्दनाथवडगांव या दोन्ही पशु रुग्णालयासाठी एकच पशुवैद्‌यकीय अधिकारी असल्याने पशूंना वेळेवर उपचार मिळत नसल्याकारणामुळे पशुधनांना प्राण गमवावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५००० पशुधनांसाठी एकच पशुवैद्यकिय अधिकारी असल्याने पशुधनांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने पशुधनांना वेळेवर उपचार मिळणाच्यादृष्टीने दोन्ही पशु रुग्णालयांना स्वतंत्र पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) व (२) औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ गाजगांव यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत १२ गावे येत असून त्यांचे एकुण पशुधन सन २०१२ च्या पशुगणनेप्रमाणे ६३४७ आहे. तसेच पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२, सिध्दनाथवाडगांव कार्यक्षेत्रांतर्गत १७ गावे असून त्यांचे एकूण पशुधन सन २०१२ च्या पशुगणनेप्रमाणे ११७१३ आहे.

पशुवैद्यकीय दवाखाना, सिध्दनाथवाडगांव, ता.गंगापूर व पशुवैद्यकीय दवाखाना, गाजगांव, ता.गंगापूर येथे श्रेणी-२ चे दवाखाने कार्यरत असून सदर दोन्ही दवाखान्यांमध्ये “पशुधन पर्यवेक्षकाचे” १-१ मंजुर पद आहे. पशुवैद्यकीय दवाखाना, सिध्दनाथवाडगांव, ता.गंगापूर येथील पशुधन पर्यवेक्षकाचे पद दिनांक ०१/०४/२०१० पासून रिक्त होते. दरम्यान सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन पर्यवेक्षक, पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२, गाजगाव यांच्याकडे सोपविण्यात येऊन त्यांचेमार्फत पशुपालक धारकांच्या जनावरांना नियमित वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत होत्या.

तद्नंतर माहे मे, २०१८ च्या जिल्हा परिषद, औरंगाबादच्या सर्वसाधारण बदल्यांमध्ये पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-२, सिध्दनाथवाडगांव येथील पशुधन पर्यवेक्षकाचे रिक्त पद बदलीने भरण्यात आले असून त्यांचेमार्फत सिध्दनाथवाडगांव येथील पशुपालकांना नियमित सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# गडचिरोली जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) * ४२५१९ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांची ८१ पदे रिक्त असल्याने उपचाराअभावी जनावरे दगावत असून पशुधनपालक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी तसेच पशुधन पर्यवेक्षक यांच्या एकूण मंजूर २४३ पदांपैकी १६६ पदे भरलेली असून ७७ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार जवळच्या पशुवैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून पशुपालकांना नियमित सेवा पुरविण्यात येत आहेत. त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात रस्ते बांधणी आणि डांबरीकरणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) * ४१८८८ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध भागातील ९१४३ कि.मी. रस्त्यांची कामे करण्यात येत असून सदर कामे रुपये ९ ते १० हजार कोटीमध्ये होणार असतांना उक्त कामांकरीता रुपये २३ हजार कोटी खर्च केल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य रस्ते बांधणी आणि डांबरीकरणात रुपये २३ हजार कोटींचा गैरव्यवहार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाल्याचे कंत्राटदार किरण सामंत यांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही. तथापि, अशा आशयाची बातमी दिनांक १ व २ एप्रिल, २०१८ च्या दैनिकात छापून आली होती. त्याचा खुलासा प्रसिध्द करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर ते टेंभूर्णी व टेंभूर्णी-अहमदनगर (जि.सोलापूर) या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१४) * ४१५७५ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर ते टेंभूर्णी (जि.सोलापूर) या रस्त्यांच्या कामामध्ये ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे वारंवार रस्त्यावरील अपघात होत असून सदर रस्त्याचे काम चालू असतांना आवश्यक त्याठिकाणी लाल झेंडे लावणे आवश्यक असतांना ते लावले जात नाही तसेच रस्ता तयार करण्यासाठी टाकण्यात आलेली खडी अस्ताव्यस्त स्वरुपात टाकलेली असल्याने त्यावरुन दुचाकी गाड्या घसरुन अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करमाळा (जि.सोलापूर) येथील टेंभुर्णी-अहमदनगर राज्य मार्गावरील जातेगाव ते टेंभुर्णी या ६२ कि.मी. अंतराच्या रस्ता चौपदरीकरणाचे काम मागील चार वर्षापासून प्रलंबित असल्याने दुरवस्थेत असलेल्या धोकादायक रस्त्यावरुन वाहनधारकांना प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी ठेकेदारावर कारवाई करुन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) करमाळा, जि.सोलापूर येथील टेंभूर्णी अहमदनगर राज्य मार्गावरील जातेगाव ते टेंभूर्णी या ६२ कि.मी. अंतराचा रस्ता चौपदरीकरण करणे या बी.ओ.टी. अंतर्गत कामाचा बांधकाम कालावधी ३ वर्ष असून तो दिनांक ३०/०३/२०१५ रोजी संपलेला आहे.

सद्य:स्थितीत सवलतकार सदर रस्त्याचे काम करण्यास व रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यासाठी प्रतिसाद देत नाही. त्यामुळे सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यासाठी वेळोवेळी सवलतकाराच्या Risk and Cost या तत्वावर खड्डे भरण्याची कामे पुर्ण करुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) उद्योजक सदरहू रस्त्याचे काम करत नसल्यामुळे तसेच देखभाल दुरुस्तीही करत नाही. त्यामुळे सदर प्रकल्पाचा करारनामा रद्द करण्याच्या अनुषंगाने निविदा काढून घेणेबाबत कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाडाळे (ता.मुरबाड, जि.ठाणे) मधील धरणाच्या कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१५) * ४१२९८ श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ३६४२३ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाडाळे (ता.मुरबाड, जि.ठाणे) मधील धरणाच्या कालव्यासाठी संपादित केलेल्या शेकडो एकर जमिनीचा मोबदला न देता सदर जमिनी शासनाने बळकावल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांनी आत्महत्येशिवाय आम्हाला पर्याय नाही असा इशारा दिला असून मुरबाडमध्येही आता १६७ शेतकरी शासनाच्या अनास्थेविरोधात न्याय मागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला न देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व शासन परिपत्रक दिनांक २५/०१/२०१७ मधील तरतूदीनुसार जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अंतर्गत सुरु आहे.

(२) अशी बाब आढळून आलेली नाही.

(३) शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व शासन परिपत्रक, दिनांक २५/०१/२०१७ नुसार खाजगी वाटाघाटीद्वारे खरेदी करण्यात येणाऱ्या जमिनींबाबत संबंधितांना शासन निर्णय व शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मोबदला अदा करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली असून त्यानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांचे अंतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर दक्षिण (जि.सोलापूर) तालुक्यातील बसस्थानकाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१६) * ४१९५२ श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर दक्षिण (जि.सोलापूर) तालुक्यातील मंद्रुप मुख्य बसस्थानकात सोयीसुविधा नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, याबाबत राज्य परिवहन महामंडळ तसेच ग्रामपंचायत याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बसस्थानक हे मध्यवर्ती ठिकाणी असुन सीना-भीमा परिसरांतर्गत मोठ्या संख्येने प्रवासी असतांनाही येथे बसण्यासाठी आसन व्यवस्था, बसस्थानकाच्या छतावर पत्रे, स्वच्छतागृह इत्यादी सुविधा नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बसस्थानकाची दुरुस्ती करुन सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) दक्षिण सोलापूर येथील मंद्रुप येथे ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये बसस्थानक नसून फक्त प्रवासी निवारा आहे. प्रवासी निवाऱ्यात प्रवाशांना फक्त बसण्यासाठी आसन व्यवस्था असते, त्याठिकाणी बसस्थानकाप्रमाणे मुलभूत सुविधा पुरविणे महामंडळाच्या धोरणात नाही.
(३) मंद्रुप येथे ग्रामपंचायत हद्दीमध्ये ४०' x १०' आकाराचा प्रवासी निवारा कार्यरत आहे. प्रवासी निवाऱ्यात १०' x १०' आकाराच्या गाळयात उपहारगृह व ३०' x १०' आकाराच्या गाळयात प्रतिक्षालय आहे. प्रतिक्षालयात प्रवाशांना बसण्यासाठी आसन व्यवस्था आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भामा आसखेड प्रकल्पाकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१७) * ४२६०१ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ३८७९४ ला दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील भामा आसखेड प्रकल्पाकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना दिला नसल्याने प्रकल्पग्रस्तांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान चाकण पोलीस ठाण्यावर आंदोलन केले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भामा आसखेड धरणग्रस्तांच्या मागण्या काय आहेत व कोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य करुन संपादित केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) आंदोलन केले हे खरे आहे.

(२) भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांनी प्रामुख्याने नागरी सुविधा, मा.उच्च न्यायालयाच्या निदेशाप्रमाणे पर्यायी जमीन मिळणे, प्रकल्पग्रस्तांना पाणी परवाने देणे, अंशत: बाधित घरांचा/गावांचा खासबाब प्रस्ताव मंजूर करणे इ. मागण्या केल्या असून त्या मागण्यांच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

अ) मौजे पाईट गवारवाडी, पापळवाडी, रौंधळवाडी, चोरगेवाडी व शिवे ता.खेड, जि.पुणे येथे नागरी सुविधा देणेबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मौजे रौंधळवाडी व चोरगेवाडी या अंशत: बाधित गावाच्या खासबाब प्रस्तावास (रुपये ४०६.४३ लक्ष) मान्यता प्राप्त झालेली असून रौंधळवाडी येथील ८५ व चोरगेवाडी येथील ४४ खातेदारांना घरांचा रुपये ३५२.५७ लक्ष इतका मोबदला देण्यात आलेला असून उर्वरित खातेदारांना मोबदला देण्याची कार्यवाही चालू आहे.

ब) मा.उच्च न्यायालयाच्या निदेशाद्वारे ३८८ याचिकाकर्त्यांची सुनावणी घेवून पात्रता तपासून कलम १६(२) च्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. ३८८ याचिकाकर्त्यांपैकी ३२५ याचिकाकर्त्यांनी ६५ टक्के रक्कम जमा केली असून त्यांना पर्यायी जमीन वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

क) प्रकल्पग्रस्तांना पाणीपरवाने देण्याबाबतच्या अनुषंगाने २४३ शेतकऱ्यांना पाणी परवाने वाटप देण्यात आले असून मागणीप्रमाणे पाणी परवाने देण्यात येत आहे.

ड) मौजे शिवे व रौंधळवाडी, चोरगेवाडी येथील अंशत: बाधित घरांचा खासबाब प्रस्ताव मंजूर करणे या मागण्यांपैकी मौजे पाईट, गवारवाडी, पापळवाडी, रौंधळवाडी, चोरगेवाडी व शिवे या गावांकरीता नागरी सुविधांच्या प्रशासकीय मान्यतांकरीता विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून जिल्हाधिकारी, पुणे यांना पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

इ) मौजे शिवे या अंशत: बाधित गावांच्या खासबाब प्रस्तावास (रु २५६.११ लक्ष) मान्यता प्राप्त झाली असून एकूण १७७ पैकी ११२ खातेदारांना घरांचा मोबदला (रुपये १३५.१४ लक्ष) वाटप केला असून उर्वरित खातेदारांना वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(३) भामा आसखेड प्रकल्पाच्या खेड तालुक्यातील बाधित २३ गावांतील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम देण्यात आलेली आहे. प्रकल्पग्रस्तांनी वाढीव मोबदला मागितलेली प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऐरोली व मुलुंड येथील टोल वसुली बंद करण्याबाबत

**(१८) * ४१९८१ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा-बायपासच्या नुतनीकरणाच्या रस्त्याच्या कामामुळे वाहतूक ऐरोली व शिळफाटामार्गे वळविण्यात आली असल्यामुळे ऐरोली व आनंदनगर (मुलुंड) येथील टोलनाक्यावर लांबच लांब वाहनांच्या रांगा लागून वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंब्रा बायपास रस्त्याच्या कामामुळे ऐरोली-मुलुंड-शिळफाटा मार्गे वळविण्यात आलेल्या वाहतुकीमुळे वाहतुक कोंडीं होवू नये याकरीता मुंब्रा-बायपासचे काम पूर्ण होईपर्यंत ऐरोली आणि आनंदनगर (मुलुंड) येथील

टोलनाक्यावरील वसुली थांबविण्याबाबत एका पक्षाच्या प्रतिनिधींनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ऐरोली-शिळफाटामार्गे रस्त्यावरील वाहतुक कोंडी दूर करण्याकरीता ऐरोली व मुलुंड येथील टोल वसुली बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) या संदर्भात दिनांक १४/०५/२०१८ रोजी राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी मुलुंड (पूर्व द्रुतगती मार्ग) येथील पथकर स्थानकावर आंदोलन केले होते, हे खरे आहे.

(३) ऐरोली व मुलुंड येथील पथकर नाक्यावरील पथकर एकाच बाजूने वसूल करण्याबाबत शासनामार्फत महामंडळास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## “मनोरा” आमदार निवासातील कामांचे बोगस देयके तयार करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(१९) * ४१८२५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०७५ ला दिनांक ८ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मनोरा आमदार निवासातील आमदारांच्या खोल्यांच्या दुरुस्तीची कामे न करताच व कमी कामे करुन जादा रकमेची देयके सादर करुन अपहार केल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनोरा आमदार निवासात खोल्यांची कामे न करताच रुपये ३ कोटी ७६ लाखाची देयके कंत्राटदारांना दिल्याप्रकरणी करण्यात आलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम दक्षता पथक मंडळ, मुंबई यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार विनिर्देशानुसार कामे न करणे, कामे अपूर्ण असतांना कंत्राटदारास अतिप्रदान करणे व कामे न करता देयक अदा करणे अशा स्वरुपाच्या प्रशासकीय व आर्थिक अनियमितता झाल्याचे दिसून येते. या बाबी विचारात घेवून उपअभियंता व शाखा अभियंता यांना दिनांक ०७/१०/२०१७ रोजी व तत्कालिन कार्यकारी अभियंता इलाखा शहर यांना दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी निलंबित करण्यात आले आहे. याशिवाय प्रकरणाशी सर्व संबंधित अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील स्थानिक मच्छिमारांच्या मागण्याबाबत

**(२०) * ४१८३१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील स्थानिक मच्छिमारांनी उर्ध्व मानार जलाशयातील परराज्यातील मच्छिमारांकडून सुरु असलेली मासेमारी थांबवावी, बेरोजगार झालेल्या स्थानिक मच्छिमारांना मासेमारी उपलब्ध करुन द्यावी, दुष्काळजन्य परिस्थितीत मच्छिमार संस्थांची तलाव ठेके माफ करून शेतकऱ्यांप्रमाणे मच्छिमारांचे कर्ज माफ करावे, नांदेड जिल्ह्यातील बोगस मच्छिमार संस्थांचे तथा नामधारी बोगस सभासद असलेल्या संस्थांची चौकशी करून त्यांची नोंदणी रद्द करावी तसेच पूर्वी प्रमाणेच स्थानिक मच्छिमार संस्थांना हेक्टरी रुपये ३०० प्रमाणे तलाव ठेका आकारण्यात यावे या न्याय मागण्यांसाठी दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उर्ध्व मानार जलाशयातील ठेकेदार संस्थेकडून परराज्यातील मच्छिमारांना मासेमारी परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच त्या जलाशयात परराज्यातील मच्छिमार मासेमारी करताना आढळून आलेले नाहीत. स्थानिक बेरोजगार मच्छिमारांना मासेमारीसाठी रितसर मासेमारी परवाना दिला जातो. दुष्काळजन्य परिस्थितीत मासेमारी ठेक्यास मुदतवाढ देण्याची तरतुद शासन निर्णयात आहे. निवेदनात उल्लेखित बोगस, अक्रियाशील मच्छिमार संस्थाबाबत उपनिबंधक (मत्स्य) सहकारी संस्था यांचेकडून चौकशी सुरु असुन तलाव ठेक्याच्या धोरणात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्याचे विभाजन करून जिल्हा व तालुका निर्मितीबाबत

**(२१) * ४१६९३ डॉ.अपूर्व हिरे, श्री.प्रसाद लाड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३३६६४ ला दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीचा शासनास प्राप्त झालेल्या अहवालावर तपासणीअंती धोरणात्मक निर्णय घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय आणि मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या धोरण/निकषानुसार नाशिक व अन्य जिल्ह्यांचे विभाजन पुनर्रचनेसंदर्भात निर्णय घेण्याचे प्रस्तावित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रिमंडळाने प्रश्नोक्त बाबीसंबंधिच्या धोरण/निकषांना मान्यता प्रदान केली आहे काय व त्यानुषंगाने नाशिक जिल्ह्याचे विभाजन करून स्वतंत्र मालेगांव जिल्हा निर्मितीबाबत शासनस्तरावरून कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, अहमदनगर, बीडसह राज्यातील इतर जिल्ह्यातून जिल्हा विभाजनाची तसेच नवीन तालुक्याची निर्मिती करण्याची मागणी सातत्याने होत असून शासनाकडे २४ नवीन जिल्हे व १०६ तालुक्याची मागणी करणारे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त (कोकण) यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या शासनास प्राप्त झालेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय शासनास प्राप्त झालेले आहे काय तसेच तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरण अंतिम करण्याची शासनस्तरावरून सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय, याप्रकरणी धोरण अंतिम करण्यात आले आहेत काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवीन जिल्हे व तालुक्यांची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून तपासणीअंती धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या धोरणानुसार/निकषानुसार नाशिक जिल्ह्याचे तसेच अन्य जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचने संदर्भात प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

(३) अहमदनगर, बीड सह राज्यातील २४ जिल्ह्याचे विभाजन करून ६७ नवीन जिल्हे निर्माण करण्याची तसेच राज्यात ११३ नवीन तालुके निर्माण करण्याची मागणी विविध माध्यमाद्वारे प्राप्त झाली आहे.

(४) व (५) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्यांचा विचार करून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी उचित कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मिती संदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यात अपहार झाल्याबाबत

**(२२) * ४१६६८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यातील शासकीय जागा विकसित करण्यासाठी महापालिकेस देण्यात आलेल्या जमिनीच्या तब्बल रुपये १९ कोटी ५४६.८० लाख रकमेची वसुली अद्यापी करण्यात आलेली नसून दिनांक १ मार्च, २०१८ रोजीच्या जिल्हाधिकारी याचे पत्र क्र. महसूल/क-१/जमीनबाब/कावि-४१९१/२०१८ अन्वये भाईंदर, नवघर, राई-मुरबे, घोडबंदर, खारी, पेनकर पाडा येथील अनुक्रमे बगीचा, चौपाटी, दफनभुमी, शाळाविस्तार आणि खेळाचे मैदान याकरीता आरक्षित असलेल्या जमिनी विनामुल्य आणि महसूल युक्त सारा माफीने प्रदान करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर रकमेच्या वसूलीकरीता जिल्हाधिकारी, ठाणे यांनी मिरा-भाईदर महानगरपालिकेस दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी सदर रक्कम तातडीने शासनास जमा करण्याबाबतचे आदेश दिले असून तब्बल तीन वर्षानंतरही सदर थकीत रक्कम वसुल न करता अतिरीक्त अन्य जमिनी विनामुल्य, महसूल मुक्त व सारा माफिने दिल्याने शासनाचे शेकडो कोटी रुपयाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०७/१०/२०१० च्या आदेशान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शासन मान्य विकास आराखड्यात किंवा प्रारुप प्रस्तावित विकास आराखड्यात अन्य सार्वजनिक सुविधेसाठी आरक्षित असलेल्या शासकीय जमिनीचे

अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे सोपवली आहे. त्यापैकी काही जमिनींचा महानगरपालिकेकडून प्रत्यक्ष वापर सुरु करण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने सदर जमिनीच्या मुल्यांकनाची रक्कम रुपये १९५४६.८०/- लाख शासन जमा करण्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३०/१२/२०१५ रोजी महानगरपालिकेस कळविले होते. तथापि, सार्वजनिक सुविधेमध्ये मोडणाऱ्या आरक्षणाखालील जमिनी आरक्षण विकसित करण्यासाठी संबंधित महानगरपालिकेस महसूल मुक्त व सारामाफीने देण्याची तरतूद असल्याने सार्वजनिक सुविधेमध्ये मोडणाऱ्या आरक्षणाखालील काही जमिनी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०१/०३/२०१८ च्या सनदेअन्वये महानगरपालिकेस महसूल मुक्त व सारामाफीने प्रदान केल्या आहेत.

-----------------

## केज (जि.बीड) येथील मांजरसुभा-पाटोदा-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा दर्जा सुधारण्याबाबत

**(२३) * ४२३०७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) येथील मांजरसुभा-पाटोदा-अहमदनगर हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-ड या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचे काम चालू असून सदर चौपदरीकरणाचे काम हे इतर रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामा पेक्षा अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील चौपदरीकरणाच्या कामात मुरूम व बारिक भूकटीचा वापर करण्यात येत असल्याने हा रस्ता दीर्घ काळ टिकणार नसल्याबाबत अनेक संघटनांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या कामाचा दर्जा सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अश्या स्वरुपाच्या तक्रारी वर्तमानपत्रामध्ये निर्दशनास आल्या आहेत. त्यानुषंगाने कामाची पाहणी करुन तक्रारीचे निवारण करण्यात आले असल्याचे मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी कळविले आहे.

अहमदपूर-कोपरा-किनगांव-अंबाजोगाई-केज-मांजरसुंबा-पाटोदा-चुंबळी फाटा राष्ट्रीय क्र. ५४८-ड केंद्र शासनाने Two lane with paved shoulders करीता सुधारणा करण्याच्या कामास मान्यता दिलेली असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून कार्यान्वित करण्यात येत आहे. सदर कामाच्या मातीकाम व Sub grade बाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. सदर रस्त्याचे काम IRC SP-७३-२०१५ च्या मानकाप्रमाणे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ऑनलाईन ७/१२ उतारा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२४) * ४२४०० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना अचूक संगणकीकृत ७/१२ उतारा देण्यासाठी शासनाच्या भूमि अभिलेख विभागाने कार्यक्रम हाती घेतला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ७/१२ उतारा सन २००२ पासून संगणकीकृत करण्यात आला होता मात्र त्यात मोठ्या प्रमाणात त्रृटी आढळून आल्यामुळे शेतकऱ्यांना अचूक संगणकीकृत ७/१२ उतारा देण्यासाठी भूमि अभिलेख शाखेकडून केंद्र शासन पुरस्कृत डिजिटल इंडिया लँड रेकॉर्ड मॉर्डनायझेशन प्रोग्रॅम राबविण्यात येत असून आतापर्यंत चार ते पाच वेळा सदरहू प्रकल्पाला

मुदतवाढ देण्यात आली तसेच मा.महसूल मंत्री यांनी दिनांक ३१ मार्च, २०१८ पूर्वी राज्यातील सर्व ७/१२ ऑनलाईन होईल अशी घोषणाही केली मात्र तरीही हे काम पूर्ण झाले नसल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील गा.न.नं. ७/१२ उतारा सन २००२ पासून संगणकीकृत करण्यात आला होता.मात्र, त्यात काही प्रमाणात चूका आढळून आल्यामुळे शेतकऱ्यांना अचूक संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ उतारा देण्यासाठी भूमि अभिलेख विभागाकडून केंद्र शासन पुरस्कृत "डिजिटल इंडिया लँड रेकॉर्ड मॉर्डनायझेशन प्रोग्रॅम" अंतर्गत एडिट व रिएडिट मोड्युल उपलब्ध करून देण्यात आले व त्याद्वारे गा.न.नं. ७/१२ मधील त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत. राज्यातील एकूण ४३,९५६ गावांपैकी ४१,८७६ गावांचे म्हणजेच ९५% कामकाज पुर्ण झाले असल्याने त्याठिकाणी शेतकऱ्यांना अचूक गा.न.नं. ७/१२ ऑनलाईन उपलब्ध होत आहे. उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भीमा कोरेगांव (जि.पुणे) येथील जयस्तंभालगत जमिनीच्या ७/१२ वरील बेकायदा नोंदी कमी करण्याबाबत

**(२५) * ४२५७२ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमा-कोरेगांव (जि.पुणे) येथील जयस्तंभालगतचे अतिक्रमण आणि जमिनीच्या ७/१२ वर लावलेली नावे दिवाणी न्यायालयाने बेकायदेशीर ठरविली असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिसरात अतिक्रमण करुन माळवदकर कुटूंबियांनी जयस्तंभांच्या ७/१२ वरही स्वत:ची नांवे बेकायदेशीरपणे लावली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जयस्तंभाच्या ७/१२ वरील बेकायदेशीर नोंदी कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी प्रकरण क्र.आरटीएस/रिव्ही/०२/२०१६ संदर्भात दिनांक ०५/०६/२०१७ रोजी दिलेल्या निकालाच्याविरुध्द माळवदकर कुटूंबियांनी मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर, पुणे यांचेकडे रे.दि.दा.क्र. ७८४/२०१७ दाखल केलेला होता.

सदर दाव्यामधील निशाणी क्र. ५ च्या अनुषंगाने मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर, पुणे यांनी दिनांक २०/१२/२०१७ रोजी दिलेल्या निकालाच्याविरुध्द माळवदकर कुटूंबियांनी पुणे जिल्हा न्यायालयाकडे संकीर्ण अपील क्र. १८/२०१८ दाखल केले होते. पुणे जिल्हा न्यायालयाने सदर अपिलामध्ये दिनांक २४/०४/२०१८ रोजी दिलेल्या निकालानुसार मौ.पेरणे, ता.हवेली, जि.पुणे येथील जयस्तंभाकडे असलेल्या गट नं. १०३३ क्षेत्रावरील अतिक्रमण काढणेबाबतच्या कार्यवाहीस स्थगिती देण्याची माळवदकर कुटूंबियांची मागणी फेटाळण्यात आलेली आहे. तथापि, मूळ दावा क्र. ७८४/२०१७ मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर, पुणे येथे अद्यापही न्यायप्रविष्ठ आहे.

(२) व (३) मौजे पेरणे, ता.हवेली येथील ग.नं. १०३३ संदर्भात फेरफार क्र. ११९४ व २०९३ अन्वये अधिकार अभिलेखात इतर अधिकार सदरामध्ये माळवदकर कुटूंबियांची/वारसांची यापूर्वी दाखल असलेली नावे उपविभागीय अधिकारी, हवेली यांच्या दिनांक ०५/०६/२०१७ रोजीच्या आदेशास अनुसरुन फेरफार क्र.६०५३, दिनांक ११/०६/२०१८ अन्वये कमी करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भात विशेषत: यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६) * ४१२५९ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात गुलाबी बोंडअळी नियंत्रणात आणण्याकरीता शासनाने दिनांक २५ मे, २०१८ पर्यंत बियाणे विक्रीस बंदी घातली आहे, ऐन पेरणीच्या काळात बियाणे विक्रीस बंदी असतांना बियाणे विक्रीत गैरव्यवहार होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील शेतकरी माहे एप्रिल-मे महिन्यात मान्सूनपूर्व बियाणे खरेदी करीत असतात परंतु, दिनांक २५ मे, २०१८ पर्यंत बियाणे विक्रीवर बंदी असल्यामुळे विदर्भातील शेतकरी बियाणे खरेदीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बियाणे विक्रीत होणारा गैरव्यवहार रोखून शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) सन २०१८ च्या खरीप हंगामात गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव नियंत्रित ठेवण्याच्यादृष्टीने व गुलाबी बोंडअळीचा जीवनक्रम खंडीत करण्याच्या उद्देशाने कापूस उत्पादक बियाणे कंपन्यांना बाजारात वितरक, विक्रेते यांना दिनांक १५ मे, २०१८ नंतर कापूस बियाणे विक्रीकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. तथापि, कापूस बियाणे वगळता इतर बियाणे बाजारात विक्री करीता उपलब्ध होती, यामध्ये कोणताही गैरव्यवहार होत असल्याचे मे, २०१८ मध्ये निदर्शनास आलेले नाही.

(२) बियाणे विक्रीवर शासनाने बंदी घातलेली नव्हती. शेतकरी बियाणे खरेदीपासून वंचित राहिलेला नाही. मुबलक व पुरेशा प्रमाणात कापूस व अन्य बियाणे बाजारात उपलब्ध असून बियाणांची टंचाई भासलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाचगांव पेंढरी (ता.उमरेड, जि.नागपूर) येथील गोशाळेतील जनावरांना चारा-पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) * ४१४६३ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचगांव जवळील पेंढरी (ता.उमरेड, जि.नागपूर) गावातील गोशाळेत जनावरांच्या आरोग्य आणि देखभालीकडे संबंधित संस्थेचे दुर्लक्ष होत असल्याने मागील दोन महिन्यात चारा व पाण्याअभावी ३५ गाई व इतर जनावरांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेंढरी येथील गोशाळेत जनावरांची एकूण किती क्षमता आहे व प्रत्यक्षात त्याठिकाणी किती जनावरांची सोय करण्यात आली आहे, राज्यात इतर जिल्ह्यात अशा प्रकारच्या किती गोशाळा आहेत, त्यांना किती अनुदान दिले जाते, याबाबतचे निकष काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) पेंढरी येथील गोशाळेत २५० ते ३०० जनावरे सांभाळण्याची क्षमता असून सद्य:स्थितीत १८९ जनावरांचे संगोपन करण्यात येते.

राज्यात अशा प्रकारच्या सुमारे ५१८ पेक्षा जास्त संस्था आहेत.

"गोवर्धन गोवंश सेवा केंद्र" या राज्यस्तरीय योजनेंतर्गत ३४ जिल्ह्यातील गोशाळांना अनुदान देण्याची योजना असून प्रत्येक जिल्ह्यातील किमान एका गोशाळेस रुपये १.०० कोटी अनुदान देण्यात येते. त्यासाठी प्रामुख्याने संस्थेकडे किमान १५ एकर जमीन, अनुदान रक्कमेच्या १०% रक्कम बँक खात्यात जमा असणे, सदरची संस्था नोंदणीकृत असणे, मागील तीन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल, इ.बाबींचे निकष ठरविण्यात आलेले आहेत.

(३) मौजे पेंढरी, ता.उमरेड, जि.नागपूर येथे गोरक्षण सभा या नोंदणीकृत संस्थेची गोशाळा असून या गोशाळेमध्ये परिसरातील पोलीस ठाण्याकडून करण्यात आलेल्या कारवाईमध्ये पकडलेली जनावरे आणि इतर व्यक्तींकडून दाखल केलेल्या जनावरांचे संगोपन केले जाते.

सदर संस्थेकडे जनावरांसाठी मुबलक चारा व पाण्याची व्यवस्था असल्याचे तसेच या संस्थेकडून जनावरांचे योग्यरितीने संगोपन करण्यात येत असल्याचे आढळून आले आहे.

तथापि, सन २०१७ मध्ये पोलिसांकडून करण्यात आलेल्या कारवाईमध्ये पकडलेली ११९ जनावरे या गोशाळेकडे संगोपनासाठी पाठविण्यात आली होती. मार्च, २०१८ मध्ये २९ जनावरे वृध्दापकाळामुळे व आजारपणामुळे मृत झाल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहूर (जि.नांदेड) तालुक्यात शासकीय अनुदानात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२८) * ४२०४९ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) तालुक्यात सन २०११ ते २०१८ या कालावधीत शेतकऱ्यांच्या नावाने बनावट प्रस्ताव सादर करुन शासकीय अनुदानात गैरव्यवहार केल्याप्रकरणी शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी, किनवट व माहूर या कार्यालयाकडे तक्रारी केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) सदर गैरव्यवहार प्रकरणी शासकीय अनुदानाचा अवैध मार्गाने कोणास लाभ मिळाला व यामध्ये सहभागी असलेल्या व योजनेचे सनियंत्रण करण्यास कुचराई करणाऱ्यांविरुद्ध तपासून जबाबदारी निश्चित करण्यासाठी सविस्तर अहवाल कृषी आयुक्तालयाकडून मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने कारवाई दरम्यान जप्त केलेल्या वाहनांची विल्हेवाट लावण्याबाबत

**(२९) * ४२३५४ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) वाहतुक नियंत्रण शाखा आणि कल्याण उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केलेल्या कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेली वाहने कल्याण-डोंबिवलीतील पोलीस स्टेशन आणि वाहतुक नियंत्रण पोलीस ठाण्यात दिवसेंदिवस वाढतच जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाहनांमध्ये रिक्षा, दुचाकी, मोटार आणि जीपचा समावेश असून ही वाहने विनावापर पडलेल्या असून, पावसाळ्यात या वाहनामध्ये पाणी साचत असल्याने डासांचा प्रादुर्भाव होऊन पोलीस कर्मचारी व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वाहतुक नियंत्रक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी कल्याण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयास जप्त वाहनांची अडचण दूर करण्याबाबत लेखी निवेदन देऊन या वाहनांची विल्हेवाट लावण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणच्या वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वाहतुक नियंत्रण शाखा व पोलीस ठाण्यात होणारी जागेची अडचण व आरोग्याची समस्या दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.

कारवाई दरम्यान जप्त झालेली वाहने नियमानुसार दंडाची आकारणी करून सोडण्यात येतात. तथापि, सोडवून घेण्यासाठी न आलेल्या वाहनधारकांची वाहने पोलीस स्टेशनमध्ये ठेवली जातात.

(३) व (४) सदर जप्त केलेल्या वाहनांच्या मालकांना कारणे दाखवा नोटीस बजावून प्रतिवेदन निकाली काढण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच जप्त वाहनांच्या लिलावाबाबतची प्रक्रिया वेळोवेळी पार पाडण्यात येवून उपप्रादेशिक

परिवहन कार्यालय, कल्याण यांचे कार्यक्षेत्रातील विविध पोलीस स्टेशन व वाहतुक शाखा तसेच कार्यालयाच्या आवारात असलेल्या वाहनांचे दिनांक ०१/०४/२०१६ ते दिनांक ३१/०३/२०१७ या कालावधीत एकूण १० लिलाव करण्यात आले असून, त्यामध्ये एकूण १५३ वाहने लिलावात काढण्यात आलेली आहे. तसेच उक्त कारवाईतून रुपये १२,२५,४८०/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भांबेड-पवारवाडी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३०) * ४२३४४ श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३८७४९ ला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांबेड-पवारवाडी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथे नव्याने उभारणी होत असलेल्या पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाच्या काँक्रीटच्या कामात दगड वापरले जात असून पुलाच्या खांबासाठी आवश्यक असलेली खोदाई झालेली नसून बांधकामात वाळूचा वापर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या दोषीं अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रश्नांकित भांबेड-पवारवाडी, जि.रत्नागिरी येथील नव्याने उभारणी केलेल्या पुलाच्या बांधकामासाठी मानकाप्रमाणे बांधकाम साहित्य वापरण्यात आले आहे.

पुलाचे काम योग्य गुणवत्ता राखून पूर्ण करण्यात आले आहे. सदर नवीन पुल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खुलताबाद ते म्हैसमाळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) रस्त्याच्या निविदेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३१) * ४२५५३ श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद ते म्हैसमाळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) या रस्त्याच्या कामाची निविदा एका नावाची असतांना ती दुसऱ्याच्या नावाने उघडण्यात आल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) प्रस्तुत प्रकरणी शासनास प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने निविदांच्या संबंधित कागदपत्रांची छाननी करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समितीची स्थापना करण्यात आली असून, समितीचा अहवाल अद्‌याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील बसस्थानकांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३२) * ४१५५६ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील गावांमधील बस स्थानकाची देखभाल, दुरुस्ती व सोयी-सुविधेअभावी दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जिल्हयातील दुरवस्थेत असलेल्या बसस्थानकाचा वापर अवैध धंद्याकरीता केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बस स्थानकाची देखभाल, दुरुस्ती करुन बसस्थानकात प्रवाशांकरीता पिण्याच्या पाण्यासह मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या अकोला, वाशिम व बुलढाणा विभागांमध्ये एकूण ३३ बसस्थानके कार्यान्वित असून, यामधील सर्व बसस्थानकांवर पिण्याचे पाणी, लाईट, पंखे, तिकिट आरक्षण, प्रसाधनगृह, प्रतिक्षालय इ. मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत. १८ बसस्थानकांची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे आवश्यक असून, सदर कामांच्या निविदा मागवून त्या मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील काळभैरव मंदिरा समोरील अंडरपास रस्त्याच्या कामाबाबत

**(३३) * ४२१५८ श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील काळभैरव मंदिरा समोरील मुख्य रस्त्यावर सुरु असलेल्या पुलाखालून जाण्यासाठी अंडरपास रस्त्याची मागणी स्थानिक नगरसेवक व नागरिकांनी करुन याबाबत आंदोलन करण्याचे निवेदन शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी सविस्तर सर्वेक्षण करून व संबंधित विभागांच्या संमतीने सुसाध्यता अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर सुसाध्यता अहवालास सक्षम प्रधिकाराची मंजुरी प्राप्त झाली असून प्रकल्पाच्या कंत्राटदारास अंडरपासचे काम करण्यास कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात मच्छीमार संस्थांना कर्ज वाटप योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३४) * ४२७२६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय सहकार विकास निगम अंतर्गत सन २०१७ अखेरपर्यंत मच्छीमार संस्थांना वाटप करावयाच्या कर्ज योजनेत कागदोपत्री संस्था बनवून कोट्यवधी रुपयांची अपहाराची प्रकरणे अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस मच्छीमार संस्थांना मदत करणाऱ्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा संस्थांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) नाही.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बोंडअळीमुळे बाधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(३५) * ४२८६७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ३७७१५ ला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बोंडअळी प्रादुर्भावामुळे ४३ लाख हेक्टर क्षेत्रापैकी ३४ लाख हेक्टर क्षेत्रावरील कापसाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून बोंडीअळीमुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्तांच्या संदर्भातील आदेशात दुरुस्ती करुन नागपूरसह वगळण्यात आलेल्या सर्व जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोंडअळीमुळे बाधित नुकसानग्रस्तांकरीता मदत निधी देण्यात आला असून नागपूर जिल्ह्याकरीता रुपये ६८ कोटी ५७ लाखांचा निधी मिळाला आहे, सदर निधी नागपूर जिल्ह्यातील फक्त ८ तालुक्यांसाठी देण्यात आला असून ५ तालुक्यांतील शेतकरी मदतीपासून वंचित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कोरडवाहू क्षेत्रासाठी हेक्टरी ६ हजार ८०० तर बागायती शेतीसाठी हेक्टरी १३ हजार ५०० रुपये आर्थिक मदत देण्याचे जाहिर केले असून यात नागपूर जिल्ह्यातील ८ तालुक्यांचे ३३ टक्के नुकसान दाखविण्यात आले. मात्र मौदा, काटोल, नरखेड, रामटेक आणि कळमेश्वर या पाच तालुक्यात नुकसान झाले नसल्याचा चुकीचा अहवाल दाखविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोंडअळींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संबधित विभाग, शेतकरी व यंत्रणांनी समन्वय साधण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिल्या आहेत, तसेच खरीप हंगामाच्या आढावा बैठकीत मा.कृषी मंत्री यांनी सर्व १३ तालुक्यांतील शेतकऱ्यांना मदत देणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयात सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बोंडअळीमुळे बाधित नुकसानग्रस्ताना अद्यापपर्यंत किती मदत शासनाने दिली आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोंडअळीमुळे बाधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये राज्यात कापूस पिकावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे सुमारे ४२ लाख हेक्टर क्षेत्रावरील कापसाचे ३३% पेक्षा जास्त नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आली.

त्यानुसार सदर घटनेमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेखाली करण्यात आलेल्या पीक कापणी प्रयोगाच्या आधारे मदत देण्याबाबत घेतलेला निर्णय अधिक्रमित करुन पंचनाम्यानुसार निश्चित झालेल्या नुकसानीसाठी मदत देण्याचा निर्णय, दिनांक १७/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला.

(२), (३), (४), (५) व (६) नागपूर जिल्ह्यात सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये कापूस पिकावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे बाधित झालेल्या क्षेत्राचे महसूल, ग्रामविकास व कृषी विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी संयुक्त सर्वेक्षण केले. त्यानुसार नागपूर जिल्ह्यातील नागपूर ग्रामीण, हिंगणा, कामठी, पारशिवनी, सावनेर, उमरेड, भिवापूर व कुही या ८ तालुक्यांतील कापूस पिकाचे ३३% पेक्षा जास्त नुकसान झाले असल्याचे व उर्वरित मौदा, काटोल, नरखेड, रामटेक व कळमेश्वर या ०५ तालुक्यांतील कापूस पिकाचे ३३% पेक्षा कमी नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

त्यानुसार शासन निर्णय दिनांक ०८/०५/२०१८ अन्वये, नागपूर जिल्ह्यात सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये कापूस पिकावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे ३३% पेक्षा जास्त नुकसान होऊन बाधित झालेल्या आपदग्रस्तांना रुपये ६८.५७ कोटी इतकी रक्कम ३ समान हफ्त्यांमध्ये वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली. त्यापैकी पहिल्या हफ्त्यामधील रुपये २३.४२ कोटी निधीपैकी रुपये १८.७४ कोटी रुपये एवढा निधी जिल्हाधिकारी नागपूर यांना उपलब्ध करुन देण्यात आला असून निधी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संबंधित विभाग, शेतकरी व यंत्रणांनी समन्वय साधण्याच्या सूचना शासनाकडून देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## औरंगाबाद प्रादेशिक मत्स्यव्यवसाय कार्यालयातील झाडे विनापरवानगी तोडल्याबाबत

**(३६) * ४२९७२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद प्रादेशिक मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत येणाऱ्या बीड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय कार्यालयातील तत्कालीन सहाय्यक आयुक्तांनी रुपये ४० लाख किंमतीची १७८ झाडे विनापरवानगी तोडल्याप्रकरणी उपायुक्त, औरंगाबाद यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल २ वर्षापूर्वी मंत्रालयातील संबंधित विभागाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी अहवालात उपायुक्त, औरंगाबाद यांनी कोणते अभिप्राय दिले आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सहायक आयुक्तांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) बीड जिल्हयातील मांजरा मत्स्यबीज उत्पादन केंद्रावर अस्तित्वात असलेली २६ निलगीरीची, १४० सुबाभुळाची, १२ इतर झाडे तत्कालिन प्रभारी सहाय्यक आयुक्त श्री.जलिल पटेल यांच्या सूचनेनुसार दिनांक ०३/०४/२०१६ ते दिनांक २७/०४/२०१६ या कालावधीत तोडल्याचे अभिप्राय उपायुक्त, औरंगाबाद यांनी आपल्या अहवालात दिलेले आहे.

(३) व (४) श्री.जलील पटेल, तत्कालिन प्रभारी सहायक आयुक्त यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव देण्याबाबत

**(३७) * ४३०९९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हा दुग्ध उत्पादक सहकारी संस्था शासकीय नियमाप्रमाणे दुधाला दर देत नसल्यामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्या दुग्ध उत्पादक सहकारी संस्थेवर कारवाई करुन दूध उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय.
(२) याप्रकरणी विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांनी सदर संघास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ अ (३) अन्वये नोटीस बजावली होती. सदर नोटीस बजावल्यानंतर सदर संघाने शासनाच्या दूध खरेदी दराप्रमाणे दूध उत्पादकांना दिनांक ११ मे, २०१८ पासून दूध उत्पादकांना ३.५/८.५ गुणप्रतीच्या दूधास रुपये २७/- असा दर देण्यास सुरुवात केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांग मराठवाडी मध्यम (ता.पाटण, जि.सातारा) प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्याबाबत

**(३८) * ४३४२८ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७७२ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांग मराठवाडी मध्यम (ता.पाटण, जि.सातारा) प्रकल्पासाठी मौजे जिंती येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करुन दिनांक ६ मार्च, २००३ रोजी तयार केलेल्या २१२ शेतकऱ्यांच्या अद्यावत संकलन यादीनुसार प्रत्येक धरणग्रस्त शेतकऱ्यास मोबदला म्हणून शासन नियमानुसार ८० हे.आर. (२ एकर) एवढे देय क्षेत्र देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संकलन यादीत पुन्हा सन २००९ मध्ये फेरफार करण्यात येऊन फक्त ९ धरणग्रस्त शेतकऱ्यांना ८० हे.आर. ऐवजी ४० हे.आर. (एक एकर) इतकी जमीन मोबदला म्हणून देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संकलन यादीत फेरफार करुन २१२ शेतकऱ्यांपैकी फक्त ९ शेतकऱ्यांना ८० हे.आर. ऐवजी ४० हे.आर. इतक्या जमिनीचा मोबदला देण्याची कारणे काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करुन उक्त धरणग्रस्त शेतकऱ्यांना सन २००३ च्या पुर्वीच्या संकलन यादीप्रमाणे मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सन २००३ ची संकलन यादी तहसिलदार यांचेस्तरावर करणेत आली होती. त्यास जिल्हाधिकारी यांची अंतिम मंजूरी मिळालेली नाही.
(२) व (३) मौजे जिंती येथील ११ खातेदारांनी बंदी दिनांकाचे लगत एक वर्षापूर्वी खातेफोड केलेली आहे. त्यांना बुडीत क्षेत्राचा विचार करुन पुनर्वसन अधिनियमातील तरतूदीनुसार ०.४० हे.आर. क्षेत्र निश्चित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्याबाबत

**(३९) * ४१७३५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ३८६६५ ला दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एक लाखाहून अधिक कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रश्न शासनस्तरावर प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, असून यासंदर्भात मा.परिवहन मंत्री यांच्यासोबत राज्य परिवहन महामंडळाच्या संघटनेने अनेक बैठक घेण्यात येवूनही वेतनवाढी संदर्भात निर्णय झाला नसल्याने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना मा.परिवहन मंत्री यांनी २० ते ४० टक्के पगारवाढ केल्याचे माहे जून, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले असून सदर कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात कोणतीही वाढ न करता केवळ भत्ता वाढ झाली असून ही वेतनवाढ न स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यांना राजीनामा द्या आणि कंत्राटावर या अशी घोषणा मा.परिवहन मंत्र्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांचा कामगार करार व त्यानुषंगाने वेतनवाढीचा प्रस्ताव महामंडळस्तरावर प्रलंबित आहे.

राज्य परिवहन प्रशासनाने मान्यता प्राप्त संघटनेबरोबर वेळोवेळी करारातील मागण्यांवर चर्चा करुनही तोडगा निघाला नाही. त्यामुळे दिनांक ०२/०४/२०१८ रोजी मा.परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी सर्व श्रमिक संघटनांची एकत्रित बैठक घेतली होती, सदर बैठकीत मान्यता प्राप्त संघटनेने दिनांक ०१/०५/२०१८ पर्यंत वेळोवेळी झालेल्या चर्चेअंती दिलेल्या देकारास/करारास सहमती न दिल्यास प्रशासन एकतर्फी वेतनवाढ जाहीर करेल, असे निर्देश देण्यात आले. राज्यात पोट निवडणूकीच्या आचारसंहितेमुळे दिनांक ०१/०५/२०१८ रोजी वेतनवाढ जाहीर करता आली नाही. मान्यता प्राप्त संघटनेने सहमती न दिल्याने दिनांक ०१/०६/२०१८ रोजी मा.परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी २०१६-२०२० या कालावधीसाठी रुपये ४८४९ कोटीचे वेतनवाढ पॅकेज जाहीर केले. केवळ भत्तेवाढ झाली हे सत्य नसून या वेतनवाढीच्या अनुषंगाने महामंडळाच्या दिनांक ०५/०६/२०१८ रोजीच्या परिपत्रकांन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

या परिपत्रकानुसार ज्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मान्य नसेल, त्यांनी दिनांक ०९/०६/२०१८ पर्यंत प्रशासनास लेखी अर्जाद्वारे कळवावे, अश्या सूचना प्रसारित केल्या. त्याचबरोबर वरीलप्रमाणे जाहीर केलेली वेतनवाढ मान्य नसलेल्या केवळ कनिष्ठ वेतनश्रेणीतील कामगारांनी राज्य औद्योगिक न्यायाधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या दाव्याच्या निकालास अनुसरुन वेतनवाढ घ्यावी किंवा राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेचा राजीनामा देण्याची मुभा असेल, अशा कामगारांना चालकांची प्रतिमाह रुपये २०,०००/- व वाहकांची प्रतिमाह रुपये १९,०००/- इतक्या मानधनावर ५ वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती केली जाईल व त्यांना प्रतिवर्षी रुपये २००/- वेतनवाढ देण्यात येईल, असे विकल्प देण्याचा निर्णय महामंडळाद्वारे घेण्यात आला आहे.

राज्य परिवहन महामंडळात दर चार वर्षांनी वेतन करार करण्यात येतो. करारानुसार वेतनवाढ व भत्ते दिले जातात. राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू केला जात नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पशुसंवर्धन विभागांतर्गत लस खरेदीतील गैरव्यवहाराबाबत

**(४०) * ४१३२८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ३७६५३ ला दिनांक ८ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुधनांना लसीच्या तुटवड्यांमुळे लाळ-खुरकुत रोगाचा प्रादुर्भाव होऊन जनावरे गंभीर आजारी होण्याचे प्रमाण वाढले असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गायी, म्हशी आणि शेळया-मेंढ्यांवरील लाळ-खुरकुत रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आलेल्या एमएमडी लस खरेदीतील गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या समितीला अहवाल सादर करण्यासाठी दिनांक ५ मे, २०१८ पासून पंधरा दिवसांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने त्यानुसार मुदतीत अहवाल सादर केला आहे काय, अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लस उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्नाधिन प्रकरणी श्री.मुकेश खुल्लर (भाप्रसे), अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीचा चौकशी अहवाल दिनांक २५/०५/२०१८ रोजी प्राप्त झालेला असून, सदर अहवालाचे स्वरुप चौकशी समितीच्या कार्यकक्षेतील मुद्दयांबाबत निदर्शनास आलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन निष्कर्ष नोंदविणे हे होते. त्यानुसार समितीने निविदा प्रक्रियेत कोणतेही गंभीर दोष आढळून आले नसल्याचे निष्कर्ष नोंदविले आहेत.

(४) ई-निविदेव्दारे प्राप्त झालेल्या न्यूनतम दरानुसार लाळ-खुरकुत लसीचा पुरवठा तातडीने क्षेत्रियस्तरावर दिनांक ०५/०३/२०१८ पासून करण्यात आलेला आहे.

लाळ-खुरकुत रोग प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम संपूर्ण राज्यामध्ये मोहीम स्वरुपात दिनांक ०५/०३/२०१८ ते २१/०४/२०१८ या कालावधीत राबविण्यात आलेला असून राज्यातील एकुण १,९१,४३,३५३ गाय व म्हैस वर्गीय पशुधनास लाळ-खुरकुत रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आलेले आहे.

(५) लागु नाही.

-----------------

## साखरी आगार (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील मत्स्यव्यवसाय जेटीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४१) * ४१४०९ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरी आगार (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे केंद्रिय कृषी योजनेंतर्गत मच्छिमारांसाठी सुमारे रुपये २ कोटी ४७ लाख ५० हजार ८४० इतक्या रक्कमेतून बांधण्यात येणाऱ्या आरसीसी जेटीचे बांधकाम गेल्या ३ वर्षापासून बंद पडलेले आहे, या जेटीचे काम ठेकेदार व्ही.डी.खामकर व मे.वतनसिंग आणि कंपनी, मुंबई यांना सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आला असून सदरहू जेटी दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४ पर्यंत पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली होती, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू कामावर माहे मार्च, २०१५ अखेरपर्यंत रुपये १६ लाख २५ हजार खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, जेटीच्या उभारणीचे काम मागील ३ वर्षापासून बंद असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन साखरी आगार जेटीचे बंद पडलेले काम पूर्ण करुन जेटी कार्यान्वित होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

(२) सदर कामावर माहे मार्च, २०१५ अखेर पर्यंत १५ लाख ४३ हजार खर्च करण्यात आला आहे

(३) ठेकेदाराकडून विलंब झाल्यामुळे व महाराष्ट्र सागरी नियमन क्षेत्र प्राधिकरणाने दिनांक १९/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर कामास सागरी नियमन क्षेत्र (सीआरझेड) ची परवानगी न घेता काम सुरु करू नये, अशी नोटीस दिलेली असल्यामुळे काम थांबविण्यात आलेले आहे.

(४) किनारी अभियंता, सा.बां. मंडळ, वांद्रे, मुंबई यांचेमार्फत महाराष्ट्र सागरी क्षेत्र नियमन प्राधिकरणाची (MCZMA) सागरी नियमन क्षेत्राची परवानगी घेणेची कार्यवाही सुरु आहे. ती प्राप्त होताच काम सुरु करणेत येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) येथे अनधिकृतपणे कृषी विद्यापीठ सुरु असल्याबाबत

**(४२) * ४२७४५ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) येथे तडवलरोडवर राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठ या नावाने अनधिकृतपणे बोगस कृषी विद्यापीठ चालविले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोगस कृषी विद्यापिठाच्या चौकशीसाठी चार पथके तयार केली असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर विद्यापिठाच्या कुलगुरुवर फौजदारी गुन्हा नोंदविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस पथकाकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यापिठाच्या कुलगुरुवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) कृषी परिषदेत प्राप्त तक्रारीनुसार हे खरे आहे.

(२) संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना सक्षम प्राधिकारी म्हणून अधिसूचित केले आहे. त्यानुसार संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे तथा सक्षम प्राधिकारी यांनी कृषी विद्यापीठ अथवा कृषी परिषदेने मान्यता प्रदान न केलेल्या कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील अनधिकृत संस्थांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी चारही कृषी विद्यापिठांचे अधिष्ठाता (कृषी) यांना प्राधिकृत केलेले आहे.

(३) सदर प्रकरणी कोणतीही तक्रार अथवा गुन्हा कृषी परिषद अथवा विद्यापीठाकडून नोंदविलेला नाही. सबब पोलीस पथकाकडून चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या दोन विद्यापीठांचा अहवाल कृषी परिषदेकडे प्राप्त झाला असून महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या विद्यापीठाच्या चौकशी समितीने पश्चिम महाराष्ट्रांतर्गत राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठ, सोलापूर या अंतर्गत दिले जाणारे कृषी शिक्षण हे अवैध स्वरुपाचे व विद्यार्थ्यांचे फसवणूक करणारे असल्याने अशा अवैध संस्थांवर गुन्हा दाखल करणे योग्य राहील असा अहवाल दिलेला आहे. प्राप्त अहवालाच्या आधारे महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्यविज्ञान, आरोग्य, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याकरीता सक्षम प्राधिकारी यांना सूचना दिनांक ३०/०६/२०१८ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) विभागाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(४३) * ४२५५१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) विभागाच्या कारभारावर वरिष्ठांचे नियंत्रण नसल्यामुळे त्याचा परिणाम उत्पन्नावर होत असल्याबाबतची याचिका मा.उच्च न्यायालयात सादर केली असल्याचे तसेच, ठाणे जिल्ह्यात राज्य परिवहन महामंडळास रुपये ३९ कोटी तोटा झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध आगारात टायरच्या प्रतिक्षेत उभ्या असलेल्या बसेस, दुरुस्तीच्या कामांमध्ये होणारा विलंब, तिकीट मशीनचा तुटवडा इतर कारणांमुळे राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या फेऱ्या रद्द होण्याचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या आगारांमध्ये नियंत्रकांचे वचक नसल्याने, तसेच मर्जीतील चालक-वाहक व इतरांना सोईची वागणूक दिली जात असल्याने महामंडळाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाचा कारभार पूर्ण क्षमतेने चालविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) राज्य परिवहन महामंडळाच्या कारभारावर नियंत्रण नसल्याने उत्पन्नावर परिणाम झाल्याबाबत उच्च न्यायालयात याचिका सादर झालेली नाही. ठाणे विभागास २०१७-२०१८ या वर्षात ३९ कोटींचा तोटा झाला हे खरे असून मागील वर्षाच्या तुलनेत ५ कोटी ३९ लाख इतका तोटा कमी झाला आहे.

(२) प्रत्येक आगार व विभागामध्ये बसगाड्यांची देखभाल करणे, टायरची दुरुस्ती करणे, इत्यादीसाठी आवश्यक चालवावयाच्या नियतांपेक्षा, जास्त बसेस उपलब्ध असतात् त्यामुळे प्रवाशी वाहतुक बसेसच्या फेऱ्या टायर अभावी रद्द झालेल्या नाहीत. राज्य परिवहन महामंडळामध्ये प्रवाशांना तिकीट देण्यासाठी चालू असलेल्या इलेक्ट्रॉनिक तिकिट प्रदान यंत्र संगणकीय आरक्षण प्रणाली (ईटीआयएम-ओआरएस) प्रकल्पांतर्गत एकूण ३८,५०० इलेक्ट्रॉनिक तिकिट प्रदान यंत्र (ईटीआयएम मशिन्स) वापरात आहेत. काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची देखभाल व दुरुस्ती कंपनीमार्फत वेळोवळी केली जात आहे. पुरेशा प्रमाणात इलेक्ट्रॉनिक तिकिट प्रदान यंत्र उपलब्ध असल्याने तिकीट यंत्राचा तुटवडा भासत नाही.

(३) हे खरे नाही.

विभागातील प्रत्येक आगारातील चालक-वाहक आणि वाहतुक नियंत्रक यांना चक्र कामगिरी पध्दतीने कामगिरी देण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात समुद्रात जाणाऱ्या बोटींवर वायरलेस यंत्रणा बसविण्याबाबत

**(४४) * ४१८६९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वादळ किंवा मुसळधार पावसाचा इशारा किमान आठवडाभर आधी मच्छिमारांना मिळणे आवश्यक असून हा इशारा अचूक हवा त्यावर मच्छिमारांना अवलंबून राहता आले पाहिजे अशी मागणी मच्छिमारांतर्फे करण्यात आली असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जोरदार पाऊस, वादळामुळे वर्षभरात १५ ते २० बोटी तरी समुद्रात बुडतात त्यामुळे ही जीवितहानी टाळण्यासाठी शासनाने खोल समुद्रात जाणाऱ्या प्रत्येक बोटींवर वायरलेस यंत्रणा बसविण्यासाठी मदत करावी आणि त्या माध्यमातून मच्छिमारांना वेळेत इशारा द्यावा, ही देखील मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील खंबाटकी घाट वळणावर सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(४५) * ४२१८७ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.रामहरी रुपनवर, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वरील खंबाटकी घाटाजवळील 'एस' वळणावर टेम्पो उलटून झालेल्या भीषण अपघातात १८ जणांचा मृत्यू झाला तर १९ जण जखमी झाले असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खंबाटकी घाटातील इंग्रजी 'एस' आकाराचे वळण जीवघेणे ठरत असुन या वळणावर वारंवार अपघात घडत असून सन २००८ पासून सन २०१७ अखेर ११६ अपघतामध्ये सुमारे ७३ व्यक्ती मृत्यूमुखी तर २१६ जण जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर घाट मार्गाच्या वळणावर सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) सातारा-पुणे महामार्गावर खंबाटकी घाटात दिनांक १०/०४/२०१८ रोजी पहाटे ५.१५ वाजता अतिवेगात असलेल्या टेम्पो चालकाचा नियंत्रण सुटल्यामुळे दुर्दैवी अपघात होवून ३३ प्रवाशांपैकी १९ जण मृत्यूमुखी पडले व १६ जण जखमी झाल्याचे पोलीस अधीक्षक, सातारा यांनी कळविले आहे.

(२) खंबाटकी घाटात एस आकाराचे वळणावर सन २००८ ते सन २०१७ अखेर ११६ अपघातामध्ये सुमारे ७३ व्यक्ती मृत्यूमुखी व २१६ व्यक्ती जखमी झालेल्या असल्याचे पोलीस अधीक्षक, सातारा यांनी कळविले आहे.

(३) सदर बाबतीत रस्ते सुरक्षा समितीने पहाणी केली असून सदर पहाणीत सुरक्षिततेच्यादृष्टीने खालील बाबींची पूर्तता करण्याचे निर्देश दिले आहेत.

(अ) रम्बलर स्ट्रीप अस्तित्वातीलपेक्षा अधिक बसविणे.

(ब) क्रश बॅरीअरची उंची वाढविणे.

(क) W बीम क्रश बॅरिअर अशा स्वरुपात बसवावे की अवघड परिस्थितीत वाहनाचे बंपर बॅरिअरला प्रथम टेकावे.

(ड) महामार्गाची शोल्डर अधिकची दबाई करुन व एका पातळीत ठेवावी.

(इ) वळण रस्त्यावर अधिकचे साईन-बोर्ड बसविणे.

(ई) "डबल च्रेवन साईन" फलक तीव्र वळणावर बसविणे.

(फ) सोलार ब्लिंकर्स बसविणे.

(ज) अतिरिक्त माहिती फलक बसविणे व ब्रिज हलविणे.

वरील उपाययोजनांची कामे पूर्ण करण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील जमिनीची नियमबाहय विक्री केल्याबाबत

**(४६) * ४१४२४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४०१८० ला दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सन २०११ मध्ये पदाचा दुरुपयोग करून नियमबाह्यरीतीने वर्ग २ च्या सुमारे ५०० एकर जमीन ज्याची किंमत रुपये २००० कोटी आहे अशा जमिनी बेकायदेशीररीतीने विक्री करण्याची परवानगी दिल्या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यास शासनाने दिनांक २० जून, २०११ रोजी शासकीय सेवेतून निलंबित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच प्रकरणात सदर अधिकाऱ्यास शासनाने दिनांक १९/०३/२०१८ च्या पत्रान्वये शासन सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करण्याचा निर्णय घेतल्याचे ज्ञापन संबधित अधिकाऱ्याला बजावण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिकारी जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड या पदावर काम करत असताना त्याच्या विरोधातील तक्रारीबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १६/०१/२०१८ रोजी चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, बीड यांना दिल्यावरून झालेल्या चौकशीत काय आढळून आले, सदर अधिकाऱ्याविरुद्ध प्रलंबित असलेली चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहात पकडल्यामुळे शासन सेवेतून कायम बडतर्फ करणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) जमीन विक्रीच्या १०४ प्रकरणात नियमबाह्य परवानगी दिल्याबाबत तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद श्री.एन.आर.शेळके यांना दिनांक २० जून २०११ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. तद्नंतर दिनांक ०४ मे, २०१२ रोजीच्या शासन आदेशान्वये श्री.शेळके यांना त्यांच्याविरुद्धच्या प्रस्तावित विभागीय चौकशीच्या अधीन राहून शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात आले होते.

सदर प्रकरणातील अनियमिततांच्या अनुषंगाने दिनांक ०४/०१/२०१४ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये श्री.शेळके यांच्याविरुद्ध म.ना.से (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरू करण्यात आली. सदर प्रकरणी सविस्तर चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रादेशिक चौकशी अधिकारी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचा अहवाल विचारात घेऊन श्री.शेळके यांना शासन सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करण्याची शिक्षा देण्याचा अंतरिम निर्णय शासनाने घेतला. सदर शिक्षेच्या अनुषंगाने १५ दिवसांत अभिवेदन करण्याबाबत श्री.शेळके यांना दिनांक १९/०३/२०१८ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये कळविण्यात आले होते. तथापि, सदर विहीत कालावधीत श्री.शेळके यांनी अभिवेदन सादर केले नसल्यामुळे श्री.शेळके यांना शासन सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, सदर शिक्षा प्रस्ताव दिनांक ०७/०६/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहमतीस्तव सादर करण्यात आला आहे.

(३) व (४) मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक १६/०१/२०१८ रोजीच्या निवेदनाद्वारे श्री.एन.आर.शेळके, तत्का.जिल्हा पुरवठा अधिकारी बीड यांच्याविरुद्ध तक्रार करुन त्यांची अकार्यकारी पदावर नियुक्ती करण्याची मागणी केली होती. सदर निवेदनाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक २३/०१/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक २९/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. दरम्यानच्या कालावधीत श्री.एन.आर.शेळके तत्का. जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांच्याविरुद्ध लाचेच्या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक करण्यात आल्यामुळे श्री.शेळके यांना दिनांक २३/०३/२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियान (जि.चंद्रपूर) अंतर्गत खरेदी केलेल्या ट्रॅक्टरचे अनुदान देण्याबाबत

**(४७) * ४२५३२ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत खरेदी केलेल्या ट्रॅक्टरचे अनुदान देण्यास संबंधित जिल्हा कृषी अधीक्षक, चंद्रपूर यांचेकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृषी अधीक्षक यांनी स्वतःच्या मर्जीतील शेतकऱ्यांना ट्रॅक्टर मंजूर करून, खुल्या बाजारातून खरेदी केलेल्या ट्रॅक्टरचे अनुदान मर्जीतील शेतकऱ्यांना देण्यात आल्याबाबतची तक्रार येरगांव येथील शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या कृषी अधीक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) होय.

(३) सन २०१५-१६ मधील प्रचलित शासकीय धोरणानुसार, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ या शासनाच्या एकमेव पुरवठादार संस्थेकडून खरेदी करणे आवश्यक होते. तथापि, येरगाव, ता.मुल, जि.चंद्रपुर येथील काही शेतकऱ्यांनी त्यांना मंजूर केलेल्या मॉडेलचे ट्रॅक्टर खरेदी न करता त्यांनी दुसऱ्याच मॉडेलचे ट्रॅक्टर खुल्या बाजारातून खरेदी केल्यामुळे त्यांना अनुदान अनुज्ञेय ठरत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील तेल्या रोगाने बाधित डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(४८) * ४३२२७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात गत दोन वर्षात डाळिंब पिकांची लागवड करण्यात आली असून सदर पिकांवर तेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

शासनाच्या हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत किड व रोगांचे नियमित सर्वेक्षण केले जात होते. सन २०१७-१८ मध्ये जिल्ह्यात कुठेही तेल्या रोगाची पातळी आर्थिक नुकसानीच्या पातळीवर गेलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोलादपूर जवळील कशेडी घाटात सहा पदरी बोगदे बांधण्याबाबत

**(४९) * ४१३५५ श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर जवळील कशेडी घाटात मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत असल्याने वारंवार अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घाटात वाहतुक कोंडी होवून अपघात होवू नयेत याकरीता घाटात सहा पदरी दोन बोगदे बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामास सुरुवात झाली आहे काय, त्याची सद्य:स्थिती काय आहे व माहे मे, २०१८ अखेर केंद्र शासनाने यासाठी किती निधी उपलब्ध करुन दिला आहे व किती निधी उपलब्ध होणे बाकी आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६, सा.क्र.कि.मी. १४८/०० ते १६१/६०० मध्ये चौपदरीकरणाच्या कामांतर्गत कशेडी घाटामध्ये तीन पदरी दोन बोगद्याचे काम केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मंजूर केलेले असून सदर कामासाठी मे.रिलायन्स इन्फ्रा लि.मुंबई-सीएआय (जेव्ही) यांचेसोबत दिनांक २५/०४/२०१८ रोजी करारनामा करण्यात आला असून कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे. प्रश्नांकित कामासाठी ४८.९६ हे. क्षेत्राच्या भूसंपादनाची आवश्यकता असून भूसंपादन निवाडे ३ (G) प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून मोबदला वाटप प्रक्रिया प्रगतीत आहे.

सदर कामास केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांनी भूसंपादनासह रुपये ७४१.३१ कोटी इतक्या किंमतीस मंजूरी दिली असून कामाच्या प्रगतीप्रमाणे निधी वितरित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सलगर ब्रुदुक (ता.जि.सोलापूर) येथील पशुधन विकास अधिकारी पद रिक्त असल्याबाबत

**(५०) * ४१९५६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ४०९६१ ला दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सलगर ब्रुदुक (ता.जि.सोलापूर) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुधन विकास अधिकारी पद रिक्त असल्याने उपचाराअभावी जनावरे दगावत आहेत, रिक्त पदामुळे पशुधनधारक शेतकऱ्यांना खाजगी पशुवैद्यकीय दवाखान्यातून पशुधनावर उपचार करुन घ्यावे लागत असून जादाचा आर्थिक भार सोसावा लागत असल्याचे दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पशुधन विकास अधिकारी पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) व (२) पशुधन विकास अधिकारी, पवैद श्रेणी-१, सलगर बुद्रुक, ता.जि.सोलापूर हे पद दिनांक ३१/०५/२०१० पासून रिक्त असले तरी सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार पविअ, पवैद श्रेणी-१, मरवडे, जि.सोलापूर यांचेकडे सोपविण्यात येवून त्यांचेमार्फत पशुपालकधारकांच्या जनावरांना नियमित वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. शासन आदेश क्र. पसंप्र २०१८/प्र.क्र.१४७/पदुम-१, दिनांक ३१/०५/२०१८ अन्वये सदर रिक्त पदावर नियमित पशुधन विकास अधिकाऱ्याची बदलीने नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आळंदी (जि.पुणे) येथे विविध रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(५१) * ४२४४९ श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक २६८७८ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी (जि.पुणे) येथे विविध रस्त्यांच्या विकासाची कामे अनेक वर्षापासून प्रलंबित असून सुरु असलेले काम कार्यक्षेत्राप्रमाणे पुर्ण होत नसल्याने वाहतुक कोंडी होऊन येथील जनजीवन विस्कळीत झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आळंदी येथील विविध रस्त्यांची चालू असलेल्या कामात नियोजन व गती आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित आळंदी, जि.पुणे हे ठिकाण धार्मिक तिर्थक्षेत्र असल्याने या ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. या भागातील बहुतेक रस्त्यांचे १८ मी. ते २० मी.पर्यंत रुंदीकरणाचे काम पुर्ण झाल्याने येथे होणाऱ्या वाहतुक कोंडीचे प्रमाण नियंत्रित झाले आहे.

(२) आळंदी येथील रस्त्यांची रुंदीकरण व मजबुतीकरणाची कामे तिर्थक्षेत्र विकास आराखाड्यानुसार मंजूर असून विविध प्रशासकिय विभागामार्फत कामे प्रगतीत आहेत. या कामांच्या नियंत्रण व देखरेखबाबतचे नियोजन जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत करण्यात येत असून सदर मंजूर रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मंजूर कामे मार्च, २०१९ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत रस्त्यावरील वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागातील मुख्य अभियंत्याची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५२) * ४१९७९ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात मुख्य अभियंत्यांसह अनेक पदे रिक्त असल्याने सेवानिवृत्त अभियंत्यांची सेवा घेतली जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी सार्वजनिक बांधकाम, उत्तर विभागात अनेक पदे रिक्त असल्यामुळे कार्यालयीन कामे विहित मुदतीत होत नसून कामे मार्गी लावण्याकरीता कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अनेक अडचणीला समोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १६ हजार कोटीचे मुंबई-नागपूर समृध्दी मार्ग, ४ हजार कोटीचे हायब्रीड ॲन्युटीचे रस्ते असे सुमारे २० हजार कोटीच्या प्रकल्पांसाठी अनुभवी मुख्य अभियंत्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सार्वजनिक बांधकाम विभागातील रिक्त पदांचा आढावा घेऊन राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील मुख्य अभियंत्यासह रत्नागिरी सार्वजनिक बांधकाम विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे, मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता या पदांवर सेवानिवृत्त अभियंत्यांची सेवा घेतलेली नाही.

(२) रत्नागिरी सार्वजनिक बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. तथापि, उपलब्ध अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून कामाचा निपटारा तत्परतेने करण्यात येत आहे.

(३) व (४) कामाची गरज विचारात घेऊन, पदे पदोन्नतीने भरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील जिल्हा पशुवैद्‌यकीय दवाखान्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(५३) * ४२०५५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) शहरामध्ये जनावरांच्या आरोग्याची काळजी घेण्याकरीता रायगड जिल्हा पशुवैद्‌यकीय दवाखाना सुरू केला असून सदर दवाखान्याची इमारत नादुरूस्त असल्यामुळे ती कधीही पडण्याची भिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दवाखान्यामध्ये अद्‌ययावत शस्त्रक्रिया विभाग नसून तेथील एक्सरे मशीन, सोनोग्राफी मशीन जुन्या व नादुरूस्त असल्यामुळे नेमके आजाराचे निदान करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पशुवैद्‌यकीय विभागाने दवाखान्याला संरक्षक भिंत बांधणे, सोयी-सुविधांच्या बळकटीकरण करणेसाठी शासनाकडे प्रशासनाकडून प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड जिल्हा पशुवैद्‌यकीय दवाखाना सुसज्ज करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) नाही.
(२) नाही.

सदर दवाखान्यात शस्त्रक्रिया विभाग अस्तित्वात असून त्यामध्ये शस्त्रक्रिया केल्या जातात. तसेच सोनोग्राफी मशीन चालु स्थितीत उपलब्ध आहे. तसेच एक्स-रे मशीनच्या युपीएसमध्ये किरकोळी स्वरुपाच्या बिघाडामुळे तात्पुरते बंद होते, ते दुरूस्त करून घेण्यात आले असून कार्यरत आहे.
(३) नाही.

तथापि, नवीन संरक्षक भिंत बांधणे व इमारतीमधील काही कक्षांमध्ये अत्यावश्यक संरचनात्मक बदल करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग व कार्यकारी अभियंता कृषी, बांधकाम वरळी, मुंबई यांच्याकडून बांधकामाचे अंदाजपत्रक मागविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी जिल्हा नियोजन समिती यांच्यामार्फत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण पशुवैद्यकिय दवाखाने/ पशुचिकीत्सालये यांचे बांधकाम, बळकटीकरण आधुनिकीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत रुपये ८५.०० लक्ष नियतव्यय मंजूर झालेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात व विभागात शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत

**(५४) * ४१७९९ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागात नापिकी, कर्जबाजारीपणा आणि शेतमालाला मिळणारा अत्यल्प भाव या कारणाने आलेल्या नैराश्यातून माहे जानेवारी ते मार्च, २०१८ या तीन महिन्याच्या कालावधीत १०१ शेतकरी आत्महत्येच्या घटना घडल्या असून नाशिक जिल्ह्यात दिनांक १६ मे, २०१८ पावेतो ३४ शेतकरी आत्महत्या घटना घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत तीन महिन्यात झालेल्या विभागातील १०१ शेतकरी आत्महत्येच्या प्रकरणांपैकी आतापर्यंत केवळ २१ शेतकऱ्यांची कुटूंबे जिल्हा चौकशी समितीच्या अहवालानुसार शासनाच्या मदतीस पात्र ठरली असून २१ शेतकऱ्यांची प्रकरणे नामंजुर करण्यात आलेली आहेत, तसेच अजुनही ५९ शेतकरी आत्महत्या प्रकरणांची चौकशी प्रलंबित असल्याने या शेतकऱ्यांची कुटूंबे अद्याप शासनाच्या मदतीच्या प्रतिक्षेतच आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यात दिनांक १ जानेवारी ते २९ एप्रिल, २०१८ या कालावधीत २८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून यापैकी २० प्रकरणांमध्येच प्रशासनाने पात्र-अपात्र शेतकरी कुटूंबे निश्चित करुन त्यापैकी केवळ ९ कुटूंबांनाच मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले व उर्वरित प्रकरणांचे अहवाल प्रलंबित असल्याचे दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय;

(४) असल्यास, महसूल प्रशासनाने सक्तीचे व जाचक निकष न लावता नाशिक जिल्हा व नाशिक विभागातील सर्व शेतकरी आत्महत्या प्रकरणांची तात्काळ नोंद घेवून व पात्र आणि अपात्रे संबंधीची चौकशी सत्वर पुर्ण करून, सर्व मृत शेतकऱ्यांचे वारस, कुटुंबियांना मदतीचे वाटप करण्यात यावे, अशी संबंधितांकडून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय ;
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मदत देऊन आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाशिक विभागात जानेवारी ते मार्च, २०१८ या कालावधीत १०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून त्यापैकी ४८ प्रकरणे दिनांक २३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयातील निकषानुसार पात्र तर ४५ प्रकरणे निकषात बसत नसल्यामुळे अपात्र ठरविण्यात आली आहेत. तसेच ८ प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित आहेत. नाशिक जिल्ह्यामध्ये जानेवारी, २०१८ ते १६ मे, २०१८ पर्यंत ३५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून १३ प्रकरणे पात्र तर २१ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत आणि १ प्रकरण फेरचौकशीकरीता प्रलंबित आहे.
(२) नाही.

नाशिक जिल्ह्यामध्ये गेल्या तीन महिन्यात १०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून ४८ प्रकरणे पात्र तर ४५ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत. तसेच ८ प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित आहेत. लवकरच चौकशी करुन तात्काळ निर्णय घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(३) नाही.

नाशिक जिल्ह्यात १ जानेवारी, २०१८ ते २९ एप्रिल, २०१८ या कालावधीत एकण २८ व्यक्तींनी आत्महत्या केल्या असून ११ प्रकरणे पात्र तर १७ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहे.

(४) व (५) दिनांक २३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयातील निकषानुसार नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्जपरतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे झालेल्या शेतकरी आत्महत्या जिल्हास्तरीय समितीने पात्र केलेल्या प्रकरणातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रुपये १.०० लक्ष तात्काळ मदत देण्यात येते.

शासन परिपत्रक, गृह विभाग, दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ अन्वये शेतकरी आत्महत्या प्रकरणी १ आठवड्यात चौकशीची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उस्मानाबाद व यवतमाळ या दोन जिल्ह्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून त्या अंतर्गत बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७" राबविण्यात येत आहे. तसेच शासनाच्या विविध विभागांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांकरीता करावयाच्या उपाययोजनांबाबतच्या सर्व प्रस्तांवाना दिनांक २४ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देऊन आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्य महामार्ग चौपदरीकरण व पारस वीज केंद्र प्रकल्पाकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(५५) * ४२५४३ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महामार्ग क्रमांक सहाचे चौपदरीकरण व पारस वीज केंद्राच्या विस्तारीत प्रकल्पाच्या भुसंपादनामुळे बाळापुर (जि.अकोला) तालुक्यातील शेकडो शेतकरी भुमिहीन झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकृत जमिनीचा मोबदला नियमानुसार देण्यात आला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असून मोबदल्यावरुन अनेक प्रकरणांमध्ये वाद सुरु आहेत तसेच पारस वीज केंद्राच्या विस्तारीकरणाकरीता अधिग्रहीत जमीन गत सात वर्षापासुन विनावापर असल्यामुळे शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाळापुर तालुक्यात भुसंपादनात झाल्याचे गैरव्यवहार निदर्शनास आल्याने अधिग्रहीत केलेल्या जमिनीसाठी वेगवेगळया दराने शेतकऱ्यांना मोबदला निर्धारीत केल्यामुळे जमिनीच्या मुल्यांकनात अन्याय झाल्यामुळे समान व वाढीव मोबदला देण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महामार्गाच्या चौपदीकरणाला अधिग्रहीत विस्तारीकरणाचा उद्देश दिलेल्या कारणासाठीच व्हावा व पारस प्रकल्पामध्ये जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ चे तरतूदीनुसार भूधारकांना जमिनीचा मोबदला देण्यात आलेला आहे. वाढीव मोबदल्याकरीता लवाद तथा अपर जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून लवादाचे अंतिम निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

पारस वीज केंद्राच्या विस्तारीकरणाकरीता अधिग्रहीत करण्यात आलेल्या जमिनीवर महानिर्मितीचा सौर प्रकल्प स्थापित करण्याचा प्रस्ताव विचाराधिन आहे.

(३) हे खरे नाही,

वाढीव मोबदल्याकरता लवाद तथा अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून लवादाचे अंतिम निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) रस्ता विस्तारीकरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा वापर महामार्गाच्या प्रयोजनाकरीताच सुरू आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

पारस वीज प्रकल्पामध्ये संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शासनाच्या नियमानुसार नोकरी देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: कोल्हापूर जिल्हयात बियाणांद्‌वारे शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी भरारी पथके स्थापन करण्याबाबत

**(५६) * ४२४०९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कोल्हापूर जिल्हयात गत वर्षात बोगस बियाण्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होवूनही शासनाने एकाही दोषीवर कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बियाणांद्‌वारे शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी स्वंतत्र यंत्रणा उभारुन भरारी पथके स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सन २०१७-१८ मध्ये राज्यात अप्रमाणित बियाणे प्रकरणी ३०२ कोर्ट केसेस व २९ पोलीस केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. तर कोल्हापूर जिल्हयात ४० प्रकरणी विक्रीबंद आदेश व ६ प्रकरणी कोर्ट केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत.

(२) होय.

राज्यात कृषी निविष्ठांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सन १९८३ पासून स्वतंत्र गुण नियंत्रण यंत्रणा कार्यरत करण्यात आली असून या यंत्रणेमार्फत गुण नियंत्रणाचे सनियंत्रण केले जात असून यासाठी एकूण ११३१ गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यापैकी ३६ बियाणे गुणवत्ता निरीक्षक कोल्हापूर जिल्ह्यात कार्यरत आहेत. तसेच, कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १३ भरारी पथके स्थापन करण्यात आलेली असून त्यांच्याद्वारे गुणवत्ता नियंत्रणाचे सनियंत्रण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात शेतीचे हेल्थकार्ड तयार करण्याबाबत

**(५७) * ४१४३८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात शेतीचे हेल्थकार्ड तयार करण्यासाठी माती परीक्षण आवश्यक असतांना जिल्ह्यात माती परीक्षणाचे काम कागदोपत्री राबविल्यामुळे माती परिक्षणाअभावी शेतकऱ्यांचे लागवड खर्च वाढत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन पाठपुरावा करुनही माती परिक्षणाचे काम न करणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्ह्यात मृद आरोग्य पत्रिकेचे पहिले चक्र (सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७) या कालावधीत राबविण्यात आलेले आहे. सदर कालावधीत १,०८,८६९ इतक्या मृद नमुन्यांची तपासणी करुन जवळपास ५,४३,३४५ इतक्या मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात आलेले आहे. तसेच, योजनेचे दुसरे चक्र (सन २०१७-१८ व सन २०१८-१९) या

कालावधीत राबविण्यात येणार असून आतापर्यंत ६०५८४ मृद नमुन्यांची तपासणी करुन १,०९,०५३ इतक्या मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धर्माबाद (जि.नांदेड) येथील अवैध वाळूसाठ्याबाबत

**(५८) * ४२०५२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) येथील जारिकोट मार्गे जाणाऱ्या चिरली घाटातील वाळू गोदाकाठच्या परिसरात अवैधरित्या मोठ्या प्रमाणात साठविण्यात आली असून सदर अवैध वाळू साठ्याबाबत शासन कोणतीच कार्यवाही करीत नसल्यामुळे शासनाचा महसूल बुडत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळूसाठा करणाऱ्यांवर तसेच, त्याकडे दर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) मौजे जारीकोट, ता.धर्माबाद येथे १३८ ब्रास इतका अवैध वाळूसाठा जप्त करण्यात आला असून या साठ्याचा नियमानुसार लिलाव करुन रुपये १,७८,२४४/- इतकी रक्कम शासन जमा करण्यात आली आहे. तसेच मौजे दिग्रस, ता.धर्माबाद येथे ३९८ ब्रास अवैध वाळूसाठा जप्त करण्यात आला असून या साठ्याचा चार वेळा लिलाव पुकारला असता त्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर रेती ज्यांच्या जमिनीवर साठवण्यात आली आहे. त्या जमीन मालकांकडून रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबड व घनसावंगी (जि.जालना) येथील तहसिलदारांनी हजारो ब्रास वाळूची परस्पर विल्हेवाट लावून गैरव्यवहार केल्याबाबत

**(५९) * ४३५५२ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड व घनसावंगी (जि.जालना) या दोन्ही तालुक्यातील तहसिलदारांनी हजारो ब्रास वाळूची परस्पर विल्हेवाट लावून गौण खनिज अप्पर जिल्हाधिकारी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार, तलाठी व ठेकेदार यांच्या संगनमताने लाखो रुपयाचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी व नागरिकांनी जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत

**(६०) * ४२५५८ श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालोजे ते जिकठाणा गंगापूर तसेच, लिबे जळगाव ते गाजगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी निविदा न काढता व शासनाची कोणतीही परवानगी न घेता रस्त्यावरील खड्डे भरण्यात येवूनही सर्व कामे बेकायदेशीरपणे करण्यात आली असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरातील सहा रस्त्याच्या कामासाठी तीन वर्षापूर्वी शासनाने रुपये २४ कोटींचा निधी वितरीत केलेल्या निधीत गैरव्यवहार झाला असून मोंढा नाका ते बालाजीनगर या रस्त्याचे काम विभागीय आयुक्ताची परवानगी न घेता रस्त्याचे काम सुरु करुन कंत्राटदारांला रुपये १ कोटीहून अधिक रक्कम अदा केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद शहरातील रस्त्याच्या कामासाठी रुपये दहा कोटी खर्च करण्यात येवूनही रस्त्याचे काम निष्कृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदेशीर, निकृष्ट दर्जाचे काम करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी व ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०१३-१४ मध्ये औरंगाबाद शहरातील एकूण १० रस्त्यांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात आली होती. ती पूर्ण करण्यात आली आहेत.

प्रश्नाधिन रस्ता मोंढा नाका ते तानाजी चौक ते सायली हॉटेल ते गुरूव्दारा कमान जालना रोड असा असून सदर काम औरंगाबाद महानगरपालिकेकडून विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून हाती घेण्यात आले होते. सदर समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंत्रालय आवारात फाऊंडेशन आणि बेडिंगचे कामात अनियमितता झाल्याबाबत

**(६१) * ४२९२९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालय आवारात फाऊंडेशन आणि बेडिंगचे कामाकरीता शासनाने माहे ऑगस्ट व नोव्हेंबर, २०१५ मध्ये कार्यादेश दिला असून सदरहू कामे झाली नसतांना सर्व देयके दिनांक २७ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास अदा केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कामाच्या अनियमिततेस जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) शासनाने दिनांक १९/०४/२०१७ च्या पत्रान्वये याबाबत चौकशी करण्याचे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम दक्षता पथक मंडळ, मुंबई यांना निर्देश देण्यात आले असून त्यानुसार चौकशी प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यात अवैध/बेकायदा रिक्षांवर कारवाई करण्याबाबत

**(६२) * ४१६३२ श्री.प्रसाद लाड, श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात ४ लाख खाजगी रिक्षांना परवान्यावर नोंदणी करून वैधता मिळविण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती, मात्र २१० खाजगी रिक्षांनी परवान्यावर नोंदणी केली असून नोंदणी न

केलेल्या उर्वरित अवैध/बेकायदा रिक्षांवर जप्तीच्या कारवाईचे आदेश मा.परिवहन मंत्री यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाला दिल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध/बेकायदा किती रिक्षा वाहतुकीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

राज्यातील खाजगी संवर्गात नोंदणी झालेल्या ऑटोरिक्षांची संख्या १.३७ लक्ष आहे. अशा रिक्षाचालकांना परवान्यावर नोंदणी करून घेण्यासाठी दिनांक २२/०९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

दिनांक १८/०६/२०१८ पर्यंत खाजगी संवर्गातून परिवहन संवर्गात परवान्यावर नोंदविण्यात आलेल्या ऑटोरिक्षांची संख्या ही २५५ इतकी आहे.
(२) व (३) खाजगी सवंर्गात नोंदणी असलेल्या अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या ऑटोरिक्षांची विशेष तपासणी मोहीम राज्यामध्ये दिनांक १६/०४/२०१८ पासून राबविण्यात आली. सदर मोहीमेंतर्गत दिनांक २१/०६/२०१८ पर्यंत एकूण २३१२ खाजगी ऑटोरिक्षा अवैधरित्या वाहतुक करताना आढळून आल्या असून सदर कार्यवाहीतून रुपये ४०,५७,८७४/- इतका दंड वसुल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देणेबाबत

**(६३) * ४१६१७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०२२ ला दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात विशेषतः बीड जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या नुकसानीबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २०१६ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर केला असून दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय आयुक्त यांनी औरंगाबाद विभागातील सर्व जिल्ह्यांचा एकत्रित निधी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार बीड जिल्ह्यातील १,७८,०१७ शेतकऱ्यांना १००३२६.९ हे.आर. क्षेत्राच्या नुकसानीसाठी रक्कम ६८,१५,४८,७२२ रुपये नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव मान्य केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, नुकसानग्रस्तांना प्रत्यक्ष निधीचे वाटप कधी होणार आहे, बीड जिल्ह्यातील यानंतरच्या अतिवृष्टी, पूरपरिस्थिती व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना किती नुकसान भरपाई देण्याचे प्रलंबित आहे व याचा तपशील काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) शासन निर्णय, दिनांक ०९ जानेवारी, २०१७ नुसार बीड जिल्ह्यातील १,७८,०१७ शेतकऱ्यांना १००३२६.९ हेक्टर आर. क्षेत्राच्या नुकसानीसाठी रुपये ६८,१५,४८,७२२ एवढी नुकसान भरपाई देण्याच्या प्रस्तावास दिनांक ०५/०६/२०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही विभागाच्यास्तरावर सुरु आहे.

माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पाऊस यामुळे बीड जिल्ह्यातील २७३ शेतकऱ्यांचे ९६.१६ हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिके/फळपिके यांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले. सदर नुकसानीपोटी आपदग्रस्त शेतकऱ्यांना रुपये ६.७७ लक्ष एवढी नुकसान भरपाई देण्याच्या प्रस्तावास दिनांक ०५/०६/२०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही विभागाच्यास्तरावर सुरु आहे.

सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये बीड जिल्ह्यात कापूस पिकावर बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे कापसाचे ३३% पेक्षा जास्त नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आली. त्यानुसार शासन निर्णय दिनांक ०८/०५/२०१८ अन्वये, बीड जिल्ह्यात सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये कापूस पिकावर बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे ३३% पेक्षा जास्त नुकसान होऊन बाधित झालेल्या आपदग्रस्तांना रुपये २५६५८.९३ लक्ष इतकी रक्कम ३ समान हफ्त्यांमध्ये वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली. त्यापैकी पहिल्या हफ्त्यामधील रुपये ८५५३ लक्ष निधीपैकी रुपये ६८४२ लक्ष एवढा निधी जिल्हाधिकारी, बीड यांना उपलब्ध करुन देण्यात आला असून निधी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत उच्च शिक्षणापासून वंचित ठेवल्याबाबत

**(६४) * ४२००८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतची यादी जिल्हाधिकारी यांनी पाठविली नसल्यामुळे गेल्या तीन वर्षात केवळ १५ मुलांनाच शिक्षणाचा लाभ मिळाला असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले मोफत उच्च शिक्षणापासून वंचित राहिल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत उच्च शिक्षणाचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाशिक जिल्ह्यातील सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची २१ मुले/मुली भारतीय जैन संघटना, वाघोली, जि.पुणे येथे मोफत शिक्षण घेत आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील मुला-मुलींची सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील यादी भारतीय जैन संघटना वाघोली, जि.पुणे यांना पाठविण्यात आली आहे. धुळे जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची यादी धरती फाऊंडेशन, नाशिक यांचेकडे पाठविण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची यादी संबंधित संस्थांना पाठविण्यात आली आहे. अमरावती, यवतमाळ, बुलढाणा या जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची यादी जनता शिक्षण संस्था, वाई, जि.सातारा तसेच भारतीय जैन संघटना यांना पाठविण्यात आली आहे. जनता शिक्षण संस्था, वाई, जि.सातारा येथे जाण्यास इच्छूक मुलांची नावे प्राप्त न झाल्याने यवतमाळ जिल्ह्याने या संस्थेस निरंक माहिती कळविली आहे. तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले मोफत उच्च शिक्षणापासून वंचित राहिल्याबाबत एकही तक्रार नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये प्राप्त झालेली नाही. यासंदर्भात स्वयंसेवी किंवा शिक्षण संस्थेने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची इच्छुकता व्यक्त केल्यास तेथे शिक्षणासाठी जाण्यास इच्छूक असलेल्या मुलांची नावे पाठविण्याबाबत सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक-पुणे महामार्गावरील शिंदे पळसे टोलनाक्याच्या परिघातील गावांना टोलमाफी देण्याबाबत

**(६५) * ४१८०० डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक-पुणे महामार्गावरील शिंदे पळसे टोलनाक्याच्या २० कि.मी. परिघातील गावांना टोलमाफी व्हावी यासाठी शिंदे टोल विरोधी कृती समितीने जिल्हाधिकारी (नाशिक) कार्यालयासमोर निदर्शने-आंदोलने करुनही शिंदे टोलनाक्यावर नाशिक-सिन्नर टोलवेज प्रा.लि., कंपनीकडून टोल वसूली सुरुच असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक २० कि.मी. परिघातील जनतेत या टोल वसुलीमुळे संताप व तीव्र नाराजी व्यक्त केली असून शालेय विद्यार्थी, पेट्रोल पंप, प्राथमिक आरोग्य केंद्र, गॅरेज, शेती तसेच खाजगी व व्यावसायिक कारणास्तव सतत ये-जा करणाऱ्या स्थानिक नागरीकांकडूनही सक्तीने टोल वसुली केली जात असल्याने ही अन्यायकारक टोल वसुली थांबवावी, अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार मागणी/आंदोलने करून तसेच निवेदने देवूनही टोलमाफी दिली जात नसल्याने व स्थानिकांना शिंदे नाक्यावर रुपये २४५ चा मासिक पास सक्तीचा करण्यात आल्याने, या विरोधात पुनश्च आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक नागरीकांकडून देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नाशिक-पुणे महामार्गावरील शिंदे पळसे टोलनाक्याच्या २० कि.मी. परिघातील गावांना टोलमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) कैंद्रिय रस्ते, वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांच्यावतीने पुणे-नाशिक रा.म.क्र. ५० अंतर्गत सिन्नर-नाशिक चौपदरीकरणाचे काम बांधा-वापरा-हस्तांतरण करा योजनेंतर्गत राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. प्रश्नांकित शिंदे पळसे पथकर नाक्यावर पथकर वसुली केंद्र शासनाच्या दिनांक ०२/०३/२०१६ रोजीच्या अधिसूचनेव्दारे व सवलतकराच्या करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या पथकर धोरणानुसार पथकर नाक्यापासून २० कि.मी. त्रिज्येतील परिसरातील गैरव्यावसायिक नोंदणीकृत वाहनाकरीता रुपये २४५/- प्रति महिना या सवलतीच्या दराने पास देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उपप्रादेशिक परिवहन (ता.अंबाजोगाई, जि.बीड) कार्यालयातील अधिकारी नियमित कार्यालयात उपस्थित राहत नसल्याबाबत

**(६६) * ४२६२४ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातून अंबाजोगाई, केज, धारुर, माजलगाव व परळी या तालुक्यांचा कारभार चालत असून याठिकाणी कर्तव्यावर जबाबदारी असणारे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हे लातूर येथून कारभार पाहत असून ते नियमित कार्यालयात उपस्थित राहत नसल्यामुळे नागरिकांची कामे नियमित वेळेत होत नसून कामे प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयातील ऑनलाईन व्यवस्थेत वारंवार बिघाड होत असल्याकारणाने साधा ऑनलाईन पेपर मिळवण्यासाठी ८ ते १० दिवसांचा कालावधी लागतो, त्यामुळे त्याचा मानसिक, आर्थिक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नियमित कार्यालयात उपस्थित न राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्यांना नियमित कार्यालयात हजर राहण्यास सूचना देऊन नागरिकांची कामे विहित मुदतीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२) व (३) शासन सेवेतील पदोन्नती मधील आरक्षणाबाबत न्यायालयीन प्रकरणामुळे आरक्षित पदे भरण्यास प्रतिबंध असल्याने, पदोन्नत कोट्यातील काही पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अंबाजोगाई या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार हा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर यांच्याकडे दिलेला आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई या कार्यालयातील रोजच्या कामाचा त्याच दिवशी निपटारा केला जात आहे. अंबाजोगाई उपप्रादेशिक परिवहन कार्यालय ग्रामीण भागात असल्याने इंटरनेट सुविधा तांत्रिक कारणास्तव खंडीत झाल्यास ऑनलाईन कामकाजामध्ये काही काळ अडचणी निर्माण होतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिग्रस दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत

**(६७) * ४१५५९ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गाकरीता गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील एका राजकीय पक्षाच्या नेत्याच्या हॉट मिक्स डांबर प्लाँटला दिनांक १ मे, २०१८ पर्यंत गौण खनिज काढण्याची परवानगी असताना तद्नंतरही विनापरवाना शासकीय अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने गौण खनिज उत्खनन सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली आहे.
(२) व (३) राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित कंत्राटदाराने परवानगीपेक्षा अधिक उत्खनन केलेल्या १३०९६ ब्रास गौण खनिजापोटी स्वामीत्वधन व करापोटी रुपये ५५,४८,२२०/- इतकी रक्कम सदर कंत्राटदाराकडून वसूल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नरसी (जि.नांदेड) येथे अवैध रेतीचा उपसा रोखण्याबाबत

**(६८) * ४२२०८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नरसी (जि.नांदेड) येथे अवैध रेतीचा उपसा प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांच्या पथकाने दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी केलेल्या कारवाईत एम.एच.२४-एबी-९३९० हायवा टिप्परवर १४ दिवसात नायगाव महसूल विभागाने कारवाई न केल्यामुळे हे टिप्पर नरसी विश्रामगृहाच्या परिसरातून पळून गेल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित महसूल विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांची उच्चस्तरावर चौकशी व्हावी व याबाबत पकडलेल्या टिप्परवर कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करावी, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) सदर वाहनाच्या मालकाकडून दिनांक १०/५/२०१८ रोजी रुपये २,१२,०००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयात पेव्हर ब्लॉकचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(६९) * ४२५६२ श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील आवारात बसविण्यात आलेले पेव्हर ब्लॉक १०० ऐवजी ७५ एमएम जाडीचे बसविण्यात आल्यामुळे एक महिन्याभरातच त्यांना तडे गेल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करुन सदर ठिकाणी चांगल्या दर्जाचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील आवारात बसविण्यात आलेले पेव्हर ब्लॉक हे अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार ६० एमएम जाडीचे बसविण्यात आले आहेत. या परिसरात वाळूची चोरटी वाहतुक करणारे जड वाहने पकडून आणली जातात. त्यामुळे काही मोजक्या पेव्हर ब्लॉक्सना बारीक तडे गेले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) उपरोक्त प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन संबंधित ठेकेदारास स्वखर्चाने तडे गेलेले पेव्हर ब्लॉक बदलण्यास सांगितले आहे. तडे गेलेले काही तुरळक पेव्हर ब्लॉक्स व्यतिरिक्त इतर पेव्हर ब्लॉक सुस्थितीत असून सदर कामाचा सर्वसाधारण दर्जा समाधानकारक आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.